क) सरकारचे कार्य व इतर संस्थांशी असलेला संबंध :

सरकारच्या कार्याचा विचार केल्यास ही समिती राज्यसरकारनेच संस्थाने विलीन झाल्यावर त्याचे व्यवस्थापन पहाण्यासाठी नेमलेली दिसून येते. या देवस्थानांची व्यवस्था धर्मादाय आयुक्तांच्याकडे सोपविण्याऐवजी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० मध्ये मुंबई कायदा क्रमांक ६/१९६० अन्वये नवीन चॅप्टर ७ अ समाविष्ट करुन पश्चिम महाराष्ट्रातील देवस्थानांच्या एकूण यादया तयार केल्या गेल्या.

सरकारी नोंदणीकृत समिती असल्याने समितीमार्फत एकप्रकारे स्वत: राज्यसरकारच या ट्रस्टचे व्यवस्थापन पहात असते. समितीतील अध्यक्ष, खजिनदार, सेक्रेटरी व समितीतील इतर संचालक वर्ग यांच्या नेमणूका प्रामुख्याने महाराष्ट्र सरकारच करत असते. या नेमलेल्या व्यक्तींकडूनच ट्रस्टचे व्यवस्थापन पाहिले जाते.

इतर खाजगी व सरकारी संस्थांशी संबंध पाहता तसा प्रत्यक्षात काही नाही. काही प्रसंगानुरुप व्यवस्थापन समितीशी या संस्थांचा संबंध येतो.

# प्रकरण - ३ रे

## भाग - ३ [ अ ]

### पश्चिम महाराष्ट्र देवस्थान मंडळाचे व्यवस्थापन :-

१] पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन मंडळाचे व्यवस्थापन कोणत्या पध्दतीने होते हे पहाणे अभ्यासाच्या दृष्टीने अगत्याचे ठरते. १९५० च्या मुंबई सार्वजनिक विश्वस्थ कायदयानुसार सन १९६८ साली देवस्थान व्यवस्थापन मंडळ [ समिती ] स्थापन करण्यात आले. व्यवस्थापन पाहण्यासाठी एक समिती नेमली जाते. या समितीतील अध्यक्ष व सदस्यांची नेमणूक महाराष्ट्र राज्य सरकार कडून होते. या समितीतसात, आठ, नऊ जण सदस्य असतात. ही समिती देवस्थान मंडळाच्या कक्षेत येणा-या पुढील जिल्हयातील देवस्थांनांची व्यवस्था व कामकाज पहात असते ते जिल्हे असे ...

१] कोल्हापूर
२] रत्नागिरी
३] सांगली
४] पूणा
५] ठाणा
६] कुलाबा

इ. देवस्थानांचे व्यवस्थापन पहाण्याचे कार्य करते. १९५० च्या मुंबई सार्वजनिक विश्वस्थ कायदयानुसार मंडळाचे नाव पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती असे ठेवण्यात आले. व या समितीची स्थापना १९६८ मधे करण्यात आली. या समितीत अध्यक्ष, खजिनदार [ ] सेक्रेटरी व इतर सदस्य अशी पदे महाराष्ट्र सरकार तर्फे भरली जातात.

समितीचे मुख्य कार्य म्हणजे जे व्यवस्थापन विषयक निर्णय घेतले जातात खर्चासाठी रक्कम मंजूर करणे, बांधकामाविषयक निर्णय किंवा इतर उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने नवीन योजनांचे ठराव मंजूर करण्यासाठी यावर चर्चा विचार

विनिमय करण्यासाठी बैठक बोलावली जाते. ही बैठक दरमहिन्याच्या १ ल्या आठवडयात बोलावली जाते. अध्यक्षांच्या सुचवेनुसार जो काही विषय बैठकीमधे मांडला जाणार आहे. त्या विषयीची सांगोपांग माहिती सेक्रेटरीने तयार ठेवावी लागते. व ती बैठकीत समितीपुढे मांडली जाते.

झालेल्या ठरावांचे जतन केले जाते. त्यांचे रेकॉर्ड ठेवले जाते. हे कार्य प्रामुख्याने समितीच्या सेक्रेटरीचे असते.

१९६७ पासून नेमलेल्या समितीतील सदस्यांची नांवे

१९६९ - मधील समिती :-

१] जी. एन. कात्रे, कोल्हापूर - चेअरमन

२] ए. बी. हावळ, कोल्हापूर - खजिनदार

३] आर. के. गुरव, "

४] जी. एस. बाके "

५] एस. एम. भेलके, जिल्हा पूणे

६] एम. ए. पाटील, कुलाबा.

१९७४ - मधील समिती :-

१] श्री. पांडुरंग बाबुजी साळुंखे

१] कोल्हापूर - अध्यक्ष

२] श्री. श्रीपतराव शंकरराव बोंद्रे
कोल्हापूर - खजिनदार

३] श्रीमती लक्ष्मीबाई बाबजी भुवड
देवरुख - रत्नागिरी

४] श्री विश्वासराव रामराव पाटील
सांगली

५] श्री· चिंतामण जोशी
अलिबाग - जिल्हा कुलाबा

१९७९ - मधील समिती :-

१] श्री इश्वरचंद्र बाळासाहेब दलवाई
कोल्हापूर, अध्यक्ष

२] श्री· नारायण बाळासाहेब घोंडी जाधव
कोल्हापूर

३] श्री· शिवराम हरी गद्रे
कोल्हापूर

४] जे· वायश जोशी
कोल्हापूर

५] श्री· रंगराव कृष्णराव गुरव
कोल्हापूर

६] श्री· विश्वासराव रामराव पाटील , खजिनदार
सांगली

७] जयनंद मंडकर एम· एल· ए·
सावंतवाडी

१९८६ मधे गद्रे यांचे निधन झाल्यावर त्यांच्या जागी बाबसाहेब कसबेकरांचे निवड म· सरकारने केली· परत १९८६ मधील नवीन सदस्य पुढीलप्रमाणे

१] श्री· अशोकराव वसंतराव साळुंखे
कोल्हापूर - चेअरमन

२] श्री· विजयसिंह अमृतराव डफळे
सांगली - खजिनदार

३] श्री· बापुसाहेब रामजी पाटील
नेरलेकर - नेर्ले - कोल्हापूर · सदस्य

४] श्री· आनंदराव हरी गुरव .
कोल्हापूर
५] श्री चित्तोजिराव अर्जुन सावंत
सिंधूदुर्ग
६] श्री· नारायण धोंडो कसबेकर
कोल्हापूर·

जून १ मधील दोन तीन वर्षे १९८४ , ८५ देवस्थानचे व्यवस्थापन हे जिल्हाधिका-यांकडे होते· समितीतील सदस्यांचा कार्य करण्याचा ~~कालावधी~~ कालावधी ही तीन वर्षाचा असतो·

जुन १९८८-८९ मध्ये समिती नेमली गेली त्यांची नांवे :-

१] श्री· शिवाजीराव हरी आजगेकर, कोल्हापूर·
२] श्री· मधुकर शंकरराव जाधव, कोल्हापूर
३] श्री· दिलीप बाळासाहेब पाटील· कोल्हापूर
४] श्री· दत्तात्रय राजाराम बगाडे, कोल्हापूर, खजिनदार
५] श्री· फत्तेसिंगराव घोरपडे, कोल्हापूर
६] श्री· बाळासाहेब रंगराव पाटील, कोल्हापूर
७] श्री· रामकृष्ण संतू सोनवणे,
८] श्री· डॉ· डी· वाय· पाटील, अध्यक्ष

अशा प्रकारे समितीतील सदस्यांची नावे होत·

समितीतील अध्यक्ष व खजिनदारांची कार्ये पुढील प्रमाणे होत·

१] <u>अध्यक्षांना मिळालेले अधिकार व त्यांनी करावयाची कार्ये :-</u>

१] बैठक बोलावणे

२] वित्तीय व व्यवस्थापकीय कामकाजावर लक्ष देणे.

३] वित्तीय व व्यवस्थापकिय कामकाजाचे पर्यवेक्षण करणे व समितीत काम करणारे अधिकार व इतर कर्मचारी वर्गाच्या वगण्यावर त्याच्याकडून व्यवस्थापनाचे कार्य योग्य रित्या होत आहे की नाही हे पडताळून पाहणे. त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे

४] ज्या विषयासंबंधी चटकन निर्ण घ्यावयाचे व ठराव मांडायचे ते प्रथम कमिटीपुढे मांडण्या अगोदर अध्यांच्या मंजुरीने मांडले जातात. तरीही कोणत्याही ठरावावर शेवटी मंजुरी देण्याचे काम अध्यक्षांचेच असते. कायदयानुसार त्यांना तो अधिकार दिला गेलेला आहे.

अ] कर्मचारी व अधिकारी लोकांची पगारी रजा, व बिनपगारी रजा मंजूर करणे.

आ] समितीतील इतर सदस्यांच्या भत्त्यांची बीले मंजूर करणे.

इ] अत्यंतिक जरूरीचे जे काम असेल आणि त्याचा खर्च २,५००/- रु. वर ५,०००/- रु. पर्यंत त्याच्या आत असेल तर अशी रक्कम समितीपुढे मांडण्याच्या आत मंजूर करणे.

ई] कामाची गती कशाप्रकारे चालली आहे याचे निरिक्षण करण्यासाठी विविध कामे योग्यरित्या पूर्ण होत आहे. कामामधे प्रगती होत आहे किंवा नाही याचे निरिक्षण करण्याचे काम व त्यासाठी अध्यक्षांना दौरे काढावे लागतात.

उ] सेक्रेटरीश आणि इतर समितीतील सदस्यांचे कामाविषयीचे गुप्त अहवाल धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पाठवावे लागतात. इतर स्टाफ मेंबर्सचे सुध्दा गुप्त अहवाल त्यांच्याकडे पाठवावे लागतात.

ऊ] जे गुप्तता अहवाल आहेत समितीतील सदस्यांचे व एकूण स्टाफचे त्यामध्ये यांच्या इच्छेप्रमाणे केलेले रिमार्कही धरले जातात.

खजिनदारांचे अधिकार व कार्ये :-

अ] खजिनदारांचे मुख्य काम म्हणजे महिन्याच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत जे जमाखर्चाचे हिशोब आहेत ते बारकाईने पाहिले. त्यांच्या इच्छेनूसार ते महिन्यातून केव्हाही हे हिशोब पाहू शकतात.

ब] करवीर निवासीनी व जोतिबा व वाडी रत्नागिरी या देवस्थानांतील मुल्यवान वस्तुंची पहाणी अध्यक्षांच्या समवेत वर्षातून एकदा करणे.

३] सेक्रेटरी कार्यवाहीचे अधिकार व कार्ये :-

१] समितीच्या मिटींग्जना हजर राहणे. मिटींग्जच्या विषया संबंधीच्या रेकॉर्ड नोटस् तयार ठेवणे.

२] कामकाजाबाबतची माहिती जमाखर्च हिशोब इ. समजण्यासाठी केंव्हाही अधिकारी किंवा इतर कर्मचा-यांना बोलावून घेणे.

३] पगारी रजा अधिका-यांची व सेवकांची मंजूर करणे.

४] कामाबाबत काही चाल ढकल होत असेल तर अधिकारी किंवा इतर कर्मचा-यांना स्पष्टीकरण विचारणे.

५] एकूण समितीवरील कामकाजावर नियंत्रण ठेवणे सुपरव्हिजन करणे.

६] महत्वाची कागदपत्रे जी मिटींग्जच्या संबंधीत असतात ती व्यवस्थीत बंदिस्त स्वरुपात ठेवणे.

७] व्यवस्थापन फंडातून एकूण व्यवस्थापनासाठी जे अंदाजपत्रक तयार केले जाते त्यानुसार रक्कम मंजूर करणे.

८] समितीच्या अंतर्गत काम करणारे कर्मचारी व अधिकारी यांच्या कामावर नियंत्रण ठेवणे, सुपरव्हिजन करणे.

९] हिशोबामध्ये काही चूक झाली असेल तर प्रत्यक्ष पुढची पायरी म्हणून समितीला

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

नोटीस पाठवणे·

१०] मिटींग्जमधे जे ठराव केले जातात· ज्या विषयासंबंधी मिटींग्ज घेतल्या जातात· त्यांच्या कॉपी सरकारी न्याय व कायदा विभागाकडे व धर्मादाय आयुक्तांच्या कडे सार्वजनिक कायदयानुसार [ ३१ - क ] पाठविणे·

११] नवीन अंदाजपत्रक दरवर्षी सादर करणे आणि ते सादर करण्या अगोदर समितीचा सल्ला घेणे, आणि एक महिना नवीन वित्तीय वर्षाच्या आधी एक महिना ते सादर करणे·

१२] पडून राहिलेल्या केसीस आहेत त्या समितीतील अधिकारी यांच्याकडून पूर्वी पूर्ण करून त्या विषयीचा रिमार्क चेअरमनला पाठवणे

१३] सर्व सरकारी दस्तऐवजांची, तसेच समितीच्या कार्यक्षेत्र येणाऱ्या ताब्यात असलेल्या जिन्नसांची नोंद उपनिर्देशित नियमानुसार उपनियम [अ] ३१ [६] खाली नोंद ठेवणे

१४] अपूर्ण असलेल्या प्रकरणांचा, तसेच कार्यवाहीत आलेल्या पूर्ण प्रकरणांचा, तसेच अधिकाऱ्यांकडून कारकून यांनी केलेल्या शिफारसीसह सर्व प्रकरणांचा अहवाल प्रत्येक महिन्याचा, अध्यक्षांना सादर करणे· तसेच सूचनांची कार्यवाही करणे·

१५] दैनंदिन कामकाजी, व्यवहारांची नोंद ठेवणे तसेच त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची नोंद ठेवणे·

१६] एखादी व्यक्ती अथवा सार्वजनिक व्यक्ति, संस्था किंवा सेवक कर्मचारी यांच्या सुचनांची नोंद घेणे, कार्यवाही करणे तसेच समिती सदस्यांनी दिलेल्या धोरणानुसार त्याची अंमलबजावणी करणे·

१७] दिलेल्या किंवा आलेल्या पावत्यांची चिकित्सा करून ती मंजूर अथवा नामंजूर करणे·

१) समितीच्या सेवकांचे वेतन, भत्ते, बोनस, यांस मंजूरी देणे व ती नामंजूर करणे. तसेच व्यवस्थापनाच्या खर्चास मंजूरी देणे वा न देणे.

२) दैनंदिन कामकाजासाठी आलेल्या खर्चाच्या बिलास मंजूरी देणे किंवा नाकारणे.

१८] वरील सर्व प्रकरणी त्यांची कारणे समितीस तसेच अध्यक्षांस सविस्तर देणे.

१९] श्री. केदारलिंग वाडी रत्नागिरी, श्री करवीर निवासीनी देवस्थानांवर देखरेख करण्यासाठी अकस्मिक / अनपेक्षित भेटी देणे व त्यांचा निरिक्षण अहवाल समिती सदस्य तसेच अध्यक्षांना सादर करणे.

२०] पुजारी किंवा गुरव, वगैरेंच्या नेमणूका अध्यक्षांचे मंजुरीने करणे.

२१] संबंधीत सेवकांच्या कामाची गुप्त अहवालात नोंद ठेवणे व तो योग्य वेळी अध्यक्षां समोर ठेवणे.

२२] समितीच्या कक्षेत येणा-या सेवकांना, अधिका-यांना, तसेच सर्व कार्यालयांना त्यांच्या कामाची / कर्तव्याची जाणीव देणे.

२३] अस्थापनाने दिलेल्या सर्व सूचनांची विधीवत अंमलबजावणी करणे. तसेच समितीशी संबंधित असलेल्या कायदयानुसार-होणा-या कायदयानुसार त्याची अंमलबजावणी करणे.

अशा प्रकारे समितीचे अध्यक्ष, खजिनदार, व कार्यवाह यांचे अधिकार व कार्ये कोणत्या प्रकारे आहेत हे समजून येते.

## प्रकरण - ३

## भाग - २

अ] **पश्चिम महाराष्ट्र देवस्थान मंडळाची कार्यालये व कर्मचारी वर्ग त्यांची नेमणूक :-**

समितीला कारभार करणे सोपे जावे म्हणून कलम ५६ एल अन्वये सचिव, इतर अधिकारी [ सचिवांव्यतिरिक्त ] व कर्मचारी वृंद नेमण्याची तरतूद आहे. पैकी सचिवांची नेमणूक शासनाकडून होते. शासनाकडून नेमला जाणारा शासकिय अधिकारी असेल असे नमूद केलेला आहे. [ १९५० च्या सार्वजनिक विश्वस्त कायदयामधे ] सचिवांव्यतिरीक्त इतर अधिकारी व कर्मचारी नेमण्याचा अधिकार समितीला दिलेला आहे.

समितीतील अधिकारी व कर्मचारी वर्ग पढील प्रमाणे असतो.

समिती सचिव

- नायब तहसिलदार व सहाय्यक सचिव [१]
  - लेखापाल [ अकौंटंट ]
  - लिपीक [२]
  - शिपाई [१]
  - वरिष्ठ लिपीक [१]
  - लिपीक [६]
  - जीप चालक [१]
  - शिपाई [३]
- बांधकाम विभाग उप अभियंता [१]
  - आवेक्षक [२]
  - द / मिस्त्री [१]
  - लिपिक [१]
  - शिपाई [१]

सचिव :-

यापैकी सचिव हे पद वर्ग २ चे असून बाकी पदे वर्ग ३ व वर्ग ४ [शिपाई] अशी आहेत. सचिव हा समितीचा जबाबदार घटक असून त्याची नेमणूक कलम ५६ एल [१] अन्वये शासनाकडून होते. सन १९७४ पर्यंत धर्मादाय आयुक्त यांचे अस्थापनेवरील अधिक्षक [ सुपरिटेंडेंट ] या दर्जाचे कर्मचारी सचिव म्हणून प्रतिनियुक्तिवर पाठवले जात होते. त्यानंतर मात्र महसूल खात्याकडील तहसिलदार श्रेणीतील [ वर्ग दोन ] अधिकारी सचिवाचे पदासाठी प्रतिनियुक्त होवू लागला.

नोव्हेंबर १९८० मधे शासनाकडून या पदासाठी सरळ सेवा प्रविष्ट व्यक्तिची नेमणूक सार्वजनिक सेवा मंडळामार्फत करण्यात आली.

इतर कर्मचारी वर्ग :-

नायब तहसिलदाराची जागा प्रतिनियुक्तीवर महसूल खात्याच्या नायब तहसिलदार सवर्गा तून भरली जाते. इतर जागा भरण्याचे अधिकार समितीस कलम ५६ एल [२] अन्वये दिले आहेत. मे १९६९ मधे जेव्हा समितीची स्थापना झाली त्यावेळी या देवस्थानांचा कारभार कोल्हापूर जिल्हयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षेतेखालील देवस्थान मंडळाकडे होते. व या देवस्थान मंडळाकडे नेमलेले कर्मचारी समितीकडे सामावून घेण्यात आले.

कलम ५६ एल [२] अन्वये समितीस सचिवा व्यतिरिक्त इतर अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन कामकाजाचे सोयीसाठी नेमण्याचा अधिकार आहे. परंतू अशा अधिका-यांच्या व कर्मचा-यांच्या जागा शासनाच्या मंजुरीने ठरतात. मागील तक्त्याप्रमाणे एकूण कर्मचारी वर्ग २२ जणांचा आहे.

देवस्थान मंडळाची कार्यालये :-

देवस्थान मंडळाचे मुख्य कार्यालय कोल्हापूर जिल्हयात आहे. या कार्यालयातूनच पूणे, ठाणे, कुलाबा, सावंतवाडी, सांगली [ सिंधुदूर्ग ] या

जिल्हयातील देवस्थानांचे व्यवस्थापन पाहिले जाते• मुख्य कार्यालय हे कोल्हापूरच ठेवण्यात आले आहे• व जोतिबा परिसर विकास करण्यासाठी जोतिबा येथे तेथील विकासाच्या योजना थोडयारित्या अमलात आणाण्याच्या दृष्टीने तेथे एक उप कार्यालय देवस्थान मंडळाने उघडले आहे•

कर्मचा-यांची नेमणूक :-

सचिवाव्यतिरिक्त उपअभियंता, अधिक्षक, नायब तहसिलदार किंवा सहाय्यक सचिव, कारकून वर्ग, शिपाई, मिस्त्री इ• नेमणूका या समितीतील सरकारने नेमलेले अध्यक्ष व कार्यवाह करत असतात• या नेमणूका बॉम्बे सिव्हील सर्व्हिस रुल प्रमाणे होतात• कर्मचारी नेमताना त्याची योग्य त्या कामास योग्य असलेली पात्रता विचारात घेतली जाते• प्रोबेशनवर नेमणूक होते काम योग्य आहे असा सेक्रेटरींचा रीमार्क झाल्यावर त्यांची नेमणूक कायम होते• कामाचे तास रोज आठ असतात• कार्यालय सकाळी १०-३० ते संध्याकाळी ५•३० पर्यंत चालू असते•

युनिफॉर्म हे ४ च्या वर्गातील कर्मचा-यांना पुरवले जातात• राज्य सरकारच्या सुट्टया या कर्मचा-यांना लागू होतात• टेंपररी नेमलेल्या कर्मचा-याचा संपूर्ण मंजूर करण्याचा अधिकार समितीला राहतो•

कर्मचा-यांच्या मूळ पगाराच्या [ महिन्याच्या ] १/३ एवढा भविष्यकालीन निधी कापला जातो• ग्रॅज्युइटीपण राज्य सरकारी कर्मचा-यांच्या नियमाप्रमाणे या कर्मया-यांना मिळते• उत्सव देयता [ कर्मचा-यांना मिळतो• ही रक्कम मंजूर करण्याचे काम सेक्रेटरीकडे असते• कोणात्याही उत्सवासाठी कर्मचा-यांना जादा पैसे मिळतात• साधारण तो १२०/-रु• पर्यंत मिळतो•

औषधोपचार देयता [ मेडिकल ॲडव्हान्स ] सुध्दा कर्मचा-यांना याचा लाभ मिळू शकतो• कर्मचा-यांना कामाची पहाणी करण्यासाठी प्रवास करावा लागतो याचा प्रवासभत्ताही मिळतो•

भाग - ३

अधिका-यांची कार्ये :-

१] सचिवांचे कार्ये :-

दैनंदिन कामकाजावर नियंत्रण ठेवणे, आपल्या हाताखालील कर्मचा-यांकडून योग्य योजनांची अंमलबजावणी करणे, समितीत उरलेले ठराव व करावयाची कामे मंजूर करून आपल्या बांधकाम विभागाकडून, हिशोब विभागाकडून, तसेच जमिनी विषयक इतर जी कामे आहेत ती योग्यरित्या होत आहेत की नाही ते पहाणे, कामे पूर्ण करणे.

देवस्थानांचेया जमिनीतील आलेले उत्पन्न त्याचा लिलाव करणे, व त्याच्या ठिकाणी जाऊन स्वत: पहाणी करणे. जमिनविषयक कामकाज , बांधकामविषयक कामकाजाचीही पहाणी करणे.

२] उप अभियंता :-

ट्रस्टच्या ताब्यात असलेल्या सर्व देवस्थानांची दुरूस्ती करणे, नवीन बांधकाम करणे या विषयीचे काम उपअभियंत्यांना करावे लागते. बांधकामाचे खर्चपत्रके किंवा पूर्ण झालेल्या कामाचे व्यवस्थीत रेकॉर्ड ठेवणे.

३] नायब तहसिलदार :-

जमिनीविषय जे कामकाज म्हणजे खंड वसूली खंड रक्कम ठरवणे, लावणी, संवणी याबाबतचे निर्णय घेणे प्रत्यक्ष पहाणी करणे.

अशा प्रकारे देवस्थान मंडळातील अधिकारी इतर नेमलेल्या कारकून, शिपाई वर्गाकडून कामे करवून घेतात. व दैनंदिन कामकाजावर योग्यरित्या होत आहे किंवा नाही. योजनांची योग्यरित्या अंमलबजावणी होत आहे किंवा नाही याबाबत दक्ष राहून अधिकारीवर्ग आपले कामकाज करत असतो. समितीतील सदस्यांनी अध्यक्ष खजिनदार वगैरेंनी मांडलेल्या योजनांची अंमलबजावणी करण्याचे कार्य अधिकारी वर्गाला करावे लागते.

सर्व नेमलेल्या कर्मचा-यांचे पगार हे देवस्थान व्यवस्थापन फंडातून दिले जातात.

भाग - ब :-

१] एकूण जमलेल्या पैशावरील देवस्थान व्यवस्थापन मंडळाचे पर्यवेक्षण :-

देवस्थान व्यवस्थापन समितीकडे एकूण जमीन, देणगीपेटया, इ. व्दारे प्रामुख्याने पैसा जमा झालेला असतो.

१] जमीनीच्या बाबतचे समितीचे पर्यवेक्षण :-

आपल्या हिंदूधर्मामधेक काय किंवा मुसलमान धर्माची जी देवस्थाने आहेत त्या देवस्थानाचा दैनंदिन खर्च भागला जावा म्हणून समाजातील काही लोकांनी संस्थांनी किंवा पूर्वीच्या राजसत्तांनी जमिनीचे उत्पन्न देवाच्या नावे केलेले आपल्याला दिसून येते. कोल्हापूर जिल्हयाचे एकंदर उदाहरण घेतल्यास एकूण २० देवांपैकी ८० टक्के देवांना त्याचा नित्य नैमितीक खर्च भागवण्यासाठी उत्पन्न आहे. आणि या देवस्थान व्यवस्थापन समितीच्या मार्फत या जमिनींच्या व्यवस्थापनाचे कार्य पाहिले जाते. आणि हे व्यवस्थापनाचे कार्य समिती १९१७ च्या वटहुकुमानुसार पाहिले जाते. त्यामधे थोडेफार फेरफार झालेले आहेत. त्यामुळे जमिनींचे व्यवस्थापन पहाण्यासाठी १९१७ चा वटहुकूम पहाणे अगत्याचे ठरते. १९१७ चा वटहुकूम हं पुढीलप्रमाणे :- देवस्थान उत्पन्नाचे व्यवस्थेबाबतीत नियम करण्यात येत आहेत ते पुढील प्रमाणे ...

१] देवस्थानास जमिनींचे किंवा

२] देवस्थाने दोन प्रकारची आहेत.

  १] गावची

  २] परगावची - यामधे परगावच्यांमधे दोन भेद केले जातात.

    १] इलाख्यातील  २] परइलाख्यातील

३] अशा प्रकारेचे देवस्थानांपैकी तेउ ज्या धर्माचे असेल त्या धर्माच्या मनुष्याच्या हातूनच त्या देवस्थानची व्यवस्था करावी.

३] देवस्थानची व्यवस्था करण्याचा व उत्पन्न देण्यामधे त्यांचा हक्क प्रथमदर्शनी सरकारचा आहे.

५] देवस्थान व्यवस्थेस कधी कधी सरपंचाचे, कधी वहिवाटदार पाटील कुलकर्णी असे किंवा वहिवाटीस अमुक पाटील किंवा अमुक कुलकर्णी अशी नावे लागतात. यावरुन ही वहिवाट सदर पाटील किंवा कुलकर्णी यांच्या हक्काची नसून ते सरकारी कामगार या नात्याने त्यांचेकडे ही वहिवाट आहे असे होते. याकरिता अशा सर्व समितीस सरपंचाचे नाव लागले आहे असे समजले जात व वहिवाटदाराचा काही हक्क ओळखला जाणार नाही, " अशा जमिनी लावणी लिलाव होण्यास पात्र राहतील"

६] देवस्थानच्या वहिवाटीस नाव इसमाचे लागले असले तरी त्या उत्पन्नवर त्याचा हक्क नाही. सदर इसमाकडून व्यवस्था बरोबर होईपर्यंत उत्पन्न त्याचेकडे चालविण्यास हरकत नाही. पण सदर इसमाने हिशोबठाक दाखविला पाहिजे.

७] " एक सत विप्रा बहुधा वदन्ति " - देव एक्च असून त्याची अनेक रुपे आहेत व या तत्वावरच या संबंधीची व्यवस्था होणे इष्ट आहे म्हणजे एका देवाचे उत्पन्न जरुरीपेक्षा जास्त असल्यास व दुस-याच कमी असल्यास वजावाट करण्यास हरकत नाही.

८] देवस्थानची व्यवस्था एक कामगार नेमून त्याच्यामार्फत सरसुभे यांचे नजरेखाली होइल त्यास जरुर तितके एस्टॅब्लिशमेंट दिले जाईलल. या सर्वांचा खर्च देवस्थानचे उत्पन्नतून काढलेल्या फंडातून घेतला जाईल.

९] देवस्थानच्या जमिनीचे उत्पन्न किती आहे, देवून दुरुस्तीकरता किती रक्कम काढम ठेवली पाहिजे, नित्य नैमित्तिक खर्च किती केला पाहिजे, यांचे एक पत्रक सदर कामगार करतील व त्याजबद्दल अधिकारास अनुसरुन सरसुभे यांनी तजवीज करण्याची आहे.

१०] देवालय बांधताना गावाच्या मधे असलेले किंवा गावात असलेले अगोदर बांधविण्याचा विचार होईल तो, देवळाचे उजवे अंगास शाळेकरता सोपा व डावे अंगास चावडीकरता सोपा बांधण्यात यावा म्हणजे पुजा व आरतीचे वेळी गावच्या लोकांना व मुलांना हजर राहण्यास सवड मिळेल.

११] जरुर तो नित्य नैमित्तीक खर्च देवूळ बांधणे व दुरुस्ती यांच्या रकमा जाता बाकीच्या रकमेचा एक फंड करण्यात येईल व सदरच्या फंडातून शाळांना मदत व

गावउपयोगी कामे म्हणजे पाण्याची सोय, धर्मशाळा बांधणे वगैरे कामाकडे खर्च करता येईल.

१२] वहिवाटीस नाव लागले असेल तर जे नित्य नैमित्तीक खर्च ठरवून देण्यात येतील तितका खर्च सदर इसमाचे मार्फत करण्यात येईल. जमीनीच्या उत्पन्नाची उर मुख्य फंडात आली पाहिजे. त्यातून देवूळ दुरूस्ती व इतर खर्च करता येतील.

१३] परगावचे देवस्थानाकडे खर्च करण्यास उत्पन्ने असतात त्या उत्पन्नाची लावणी, संचणी देवस्थान खात्यामार्फत होईल. योग्य खर्चाकरता जरूर ती रक्कम वहिवाटदारां कडे देता येईल.

१४] गावच्या किंवा परगांवच्या देवाचा खर्च योग्य तो चालला पाहिजे पण तो फाजील असता काम नये. उदाहरणार्थ देवळात नंदादीपाची सोय असल्यास दुसरा नंदादीप बंद करण्यास हरकत नाही, व ती रक्कम जनरल फंडात यावी.

१५] परइलाख्यातील देवस्थान संबंधाने जास्त खबरदारी घेणे जरूर आहे. या देवस्थानांवर दुसरीकडून खर्च होत असतो इकडील उत्पन्नातून बहुदा खर्च होत नाही. वहिवाटदार उत्पन्न आपल्या कामाकडे लावतात हे बंद करणे.

१६] अशा परइलाख्यातील देवस्थानांकडे जरूर तितकी रक्कम देण्यात हरकत नाही. पण सदर कामी काय काय खर्च केला पाहिजे हे ठरवून देण्यात येईल.

वरील वटहुकुमानुसार देवस्थानच्या सर्व उत्पन्नाची व्यवस्था पाहिली जाते. त्या नंतर १९५० च्या सार्वजनिक विश्वस्थ अधिनियमातील कलम ५६ ड नुसार देवस्थानची जमिन मिळकत ही देवस्थान समितीचे पूर्ण मालकीची असून विश्वस्त या नात्याने समिती पूर्ण मालक आहे म्हणून देवस्थाने व्यवस्थापन मंडळकाडे, जमिनीच्या लावणी व संचणी बाबत निर्णय व रक्कम वसूल करण्याचा अधिकार देवस्थान व्यवस्थापन समितीलाच प्राप्त झालेला आहे.

सरकारकडून लागणीस दिल्या जाणा-या देवस्थान जमिनी या कुळ या नात्याने लावणीस दिल्या जातात. आणि जे कुळे आहेत ती कुटुंबे, इसम, ऊस, भात, गवत, जिराईत इतर पिकासाठी पत्करल्या जाणा-या जमिनीच्या कुळाकडून स्विकारत किंवा लिहून घेतला जातो. त्यामधे खालील प्रमाणे कॉलम असतात.

१] जमिनीच्या सर्व्हे नंबर

२] जमिनीची लागवड कोणत्या पिकासाठी करणार याचा तपशील

३] जमिन एकर किंवा हेक्टर लागवड

४] लागणा रक्कम, ऐन आकार, लागणा ऐन रक्कम आकार

५] लोकल फंड

६] आकार रुपये

७] एकूण इ.

या प्रमाणे तपशिल लिहून वेगवेगळया बागाईत या व जिराईत जमीनीसाठी खंडाची रक्कम वेगवेगळी ठरवली जाते. पूर्वी ही खंडाची रक्कम सरकारी शेतसारा [ ] कार्यालयामार्फत ठरवली जात असे. परंतू अलीकडे १९९७ पासून देवस्थान व्यवस्थापन मंडळच जमिनीच्या लागवणा व खंडाची वसूल करते.

खंडाची रक्कम ठरल्यानंतर सुध्दा देवस्थान जमिनीच्या कुळक-यांना काही अटी घालतल्या जातात व त्यांचे पालन करणे आवश्यक ठरते. अटी पुढीलप्रमाणे आहेत.

१] सदरहू जमिनीची वहिवाट एकसाल करून व रक्कम लोकल फंड व आकारसुध्दा गावात सरकारी हप्त्याप्रमाणे खंड म्हणून भरणा करून पावती घेवून रक्कम न भरल्यास कुळक-यांचे स्थावर जंगम इस्टेटीतून सर्व देणे वसूल करून घ्यावे.

२] सदर जमिनीचा उपयोग शेतीखेरीज इतर कामास करणार नाही. जमिनीत

मातीचे किंवा दगडाची खाण वगैरे काढणार नाही. भूमिगत द्रव्य सदर जमिनी मधे सापडल्यास त्यावर हक्क न सांगता सरकारामधे हजर करीन.

३] जमिनीच्या सर्व्हेच्या हद्दी कुळकरी आपल्या खर्चाने सर्व्हेच्या नियमाप्रमाणे व वटहुकुमा प्रमाणे दुरुस्त राखेल. तसे त्याच्याकडून न झाले तर सरकारमधून दुरुस्ती होवून तो खर्च येईल तो कुळक-याकडून वसूल केला जाईल व पडेल तो दंड सुध्दा त्याने भरावा, शिवाय जमिन योग्य, बि सोज्वळ व निकुंदा राखीन नादुरुस्ती केल्यास सरकारमधे योग्य ती नुकसानी भरली जावी. सदर रानात कडे व मखमली असेल तर ती कुळक-याने नाहिशी करावी. सर्व्हे खर्च कुळक-याने भरला नाही तर त्याच्या स्थावरे जंगम मालमत्तेतून हा खर्च वसूल करून घेतला जावा.

४] जमिनीतील झाडांचे संरक्षण त्या नेमलेल्या कुळाने करावे. झाडांचे नुकसान झाल्यास पंचांच्या मते ठरेल ती रक्कम भरावी लागेल. किंवा झाडे व दुस-याने तोडली आणि त्याचा पत्ता लावून दयावा तसे झाले नाही तर झाडांची किंमत दसपट पर्यंत दंड कुळाकडून वसूल केला जाईल.

५] जमिनीची खराबी केली असेल तर ती जमिन कुळाकडून काढून घ्यावी.

६] सदर जमिन स्वत: जातीने केली जावी पोटकूळ वगैरे ठेवता येणार नाही पोटकुळाला लागण करता येणार नाही.

जमिनींची उत्पन्ने ही इनाम व रयतावेत म्हणून देवाला दिलेली आहेत. त्याचप्रमाणे देवालयात जो कामकरी वर्ग आहे त्याचे पोट चालण्यासाठी त्याने देवाची योग्यरित्या देखभाल ठेवण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची इनाम जमिनी दिलेल्या दिसून येतात. ती इनामे पुढील प्रमाणे आहेत.

१] धर्मादाय इनाम

२] गाव हक्दारा पैकी

[ यामधे गावतील पुढील,प्रमाणे लोक येतात. ]

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १] | शेटे | २] | महाजन | ३] | नाईक | ४] | खोत |
| ५] | हवालदार | ६] | महार तराळ | ७] | महार | ८] | आवटी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३] | बाजे इनाम | ४] | चोळकार इनाम |
| ५] | आंबील काट | ६] | खुनकार |
| ७] | जात इनाम | ८] | दुमालदार देणगी |
| ९] | बलुतदार | ९] | बाळ प्रवासी |
| १०] | बिगर दाखली | ११] | बक्षीस |
| १२] | रांड रोटी | १४] | बिन नोकरी |

बाजे दनाम खुनापैकी देवस्थानकडे व सरकार चावडीकडे [ सनदी, कुरण रखवाली, धस्ती इ. ] आहेत.

सरसुभे अ. जा. १९२९ नुसार :-

अ] बाजे इनाम खुनापैकी देवस्थानकडे व सरकार चावडीकडे प्रत्यक्ष नोकरी बारमाही अगर तूट मुदतीने ज्या इसमांची होत आहे ती इनाम उत्पन्ने तूर्त आहेत तशीच इनामातून कमी करुन इनामातून कमी करुन सालमजकुरी रयतावेत दाखल केले व कोणते ठेवले नाही या विषयी पहात असतात.

१] गुरु महाराज घराण्यातील धर्मादाय वगैरे इनाम.

२] श्री स्वामी जगद्गुरु मठ करवीर वगैरे सारखे मठ संस्थेचे उत्पन्न निरनिराळ्या जातीच्या मठाधिपतींची उत्पन्ने त्या सार्वजनिक संस्था असल्याने त्या पूर्ववत इनामात धरल्या जातील.

जेव्हा सरकारने १९७२ मधे जे कुळकायदा व खंड निश्चितीचे कायदे केले ते देवस्थानच्या इनाम जमिनींना लागू करण्यासाठी कुळांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने १९७४ मधे एक सरकारी नियमावली प्रसिध्द केली.

त्यामध्ये जुन्या जमिनी भाडे पदटीने देण्यासाठी परत जुन्या कुळांना आपली नावे रेन्व्हेन्यू [ रेव्हेन्यू ] खात्याला कळवावीत तसेच त्यांच्या कडे किती एकर जमीन ताब्यात आहे. नवीन जमिन धारणा कायदयानुसार कितपत जमिन प्रत्येक कुळाकडे लागवडीसाठी ठेवली जाणार या विषयी काही सुचना त्या त्या जिल्हयातील रेव्हेन्यू अधकारी व जिल्हाधिका-यांना दिल्या गेल्या .

देवस्थान जमिनींचे खंडाची वसूली :-

देवस्थान जमिनीची लागण व वसुली महसूल खात्यामार्फत होत होती. परंतू १५.५.१९६९ पासून समिती अस्तित्वात आल्या नंतर वसुलीमधे दिरंगाई निर्मा ण झाली. १९७३ - ७४ अखेर लागण लिलावाची रक्कम ७,६७,०००/- येणे होती. ही लागण लीलावाची प्रचंड बाकीचे आझे पूर्वीच्या कमिटीने नविन कमिटीवर सोपवले. याबाबत आताच्या कमिटीने वेळोवेळो मे. जिल्हाधिकारी, प्रांत अधिकारी, तहसिलदार व तलाठी यांच्या मिटिंग्ज घेवून मिटींगमधे ठरल्या प्रमाणे त्या त्या तालुक्यात देवस्थानचे कर्मचारी पाठवून लावणीपत्रके गोळा करून बाकी वसुलीला ताबडतोबीने चालना मिळू लागली पुढील ५ वर्षातील ७,६७,०००/- बाकीपैकी सन १९७४-७५ ते ७६ - ७७ या तीन वर्षाच्या कारकिर्दीमधे एकूण ५ लाख २२ हजार बाकी वसुल झाली. राहिलेल्या २ लाख ४५ हजार बाकी अधिक सन १९७७ - ७८ मधील बाकी २,००,०००/- व ४,४५,०००/- बाकी पैकी ३,००,०००/- बाकी १९८० पर्यंत देवस्थान मंडळाचे कर्मचारी स्वत: त्या त्या गावात जावून लावण लिलाव करतात. व आलेली रक्कम एकूण देवस्थान फंडामधे जमा केली जाते.

पश्चिम महाराष्ट्र देवस्थान मंडळाची इतर कार्ये :-

प्राथमिक शाळांच्या ~~xxx~~ इमारतींचे भाडे वसूल करणे.

देवस्थान व्यवस्थापन मंडळाकडे शासनाने जी देवालये व्यवस्थेस सुपूर्द केली आहेत त्यातील कोल्हापूरातील काही देवालयांमधे प्राथमिक शाळा भरतात. अशा जिल्हापरिषदेकडे प्राथमिक शाळांचे सन १९६१ पासून भाडे पडून राहिलेली भाडेबाकी रु. १,२३,०००/- येणे होती. या येणेबाकी वसुली बाबत पत्रव्यवहार करून सुध्दा सदरची रक्कम वसुल झाली नाही. याबाबत देवस्थान मंडळाचे अध्यक्ष वेळोवेळी भेटी घेवून व डायरेक्टर ऑफ एज्युकेशन ऑफ पूना यांच्याशी वेळोवेळी पत्र व्यवहार करून शाळा भाडयाची बाकी रक्कम रुपये १,२३,०००/- सन १९७७ - ७८ मधे समितीने वसूल केली आणि यापुढेही दरमहा शाळा भाडयाची वसूली सतत राहण्या बाबत प्रयत्न चालू असतात.

एकूण देवस्थानांचे उत्पन्न देवस्थान जमिनींच्या उत्पन्नसहित एकत्रित देवस्थान फंडात जमा केले जाते. व त्यातून १० टक्के रक्कम समितीच्या व्यवस्थापन फंडामधे जमा केली जाते. या रकमेतून समितीमधे किंवा मंडळामधे काम करणाऱ्या लोकांचे पगार दिले जातात. कोल्हापूरची श्री करवीर निवासीनी, व वाडी रत्नागिरी ता. पन्हाळा येथील श्री केदारलिंग [ जोतिबा ] या दोन देवस्थानांच्या उत्पन्नाचा व खर्चाचा हिशोब स्वतंत्र ठेवला जातो. व बाकी एकत्रीत देवस्थाने फंडाचा हिशोब स्वतंत्र आहे. सिंधुदुर्ग व सांगली जिल्हयाचे देवस्थान फंड वेगवेगळे आहेत.

## दागिने व इतर मुल्यवान वस्तुंची देखरेख :-

देवांना काही मुल्यवान दागदागिने तसेच इतर वापरामधे चांदीच्या भांडी वगैरे असतात. त्यांची दरवर्षी दुरुस्ती केली जात. दागदागिने हे खेडयातील पोलीस पाटील किंवा पंचायतीच्या मुख्य व्यक्तिकडे सांभाळावयास दिले जातात.

बांधकाम विषयक मंडळाचे व्यवस्थापन :-

प्रास्ताविक :-

देवस्थान व्यवस्थापन समितीची एकूण कोल्हापूर जिल्हयातील [ देवालयाची ] देवांची संख्या लक्षात घेता प्रत्यक गावपातळीवर देवालयाच्या बांधकामाच्या खर्चाची उचल अशाप्रकारे केली जाते हे पाहताना प्रथमत: दोन प्रकारे बांधकामबाबत व्यवस्थापन केले जाते.

१] गावपातळीवरील देवालयांचे बांधकामाबाबतचे व्यवस्थापन - [ ग्रामदैवंताचे ]

२] करवीर निवासीनी व जोतिबा देवालयाच्या बांधकामाबाबतचे व्यवस्थापन

१] गावपातळीवरील देवालयांचे व्यवस्थापन :-

गावपातळीवरील देवालयांचे व्यवस्थापन करताना प्रथमत: त्या त्या गावातील लोक आपल्या गावातील देवालय पडले आहे पुन्हा त्याची बांधणी केली जावी एखादे नवीन देवालय बांधावयाचेअसेल असेल तसेच जूने देवालय पडलेले किंवा त्याची रिपेअरी करावयाची असेल तर गावपातळीवर ग्रामपंचायतीमार्फत एक ग्रामसभा बोलावली जाते त्या ग्रामसभेमार्फत देवालयाची दुरूस्ती, नवीन बांधकाम, वगैरे बाबत एक अर्ज त्या त्या गावाकडून देवस्थान समितीकडे केला जातो. हा अर्ज समितीकडे आल्यानंतर त्या त्या गावच्या ग्रामसभेमधे देवालयाची दुरूस्ती किंवा नवीन बांधकामाचा ठराव हावून अर्ज आल्यानंतर देवस्थान व्यवस्थापन समितीकडे ह ही समितीतील सदस्य त्या अर्जाचा विचार करतात व ठराव मंजूर करतात.

नवीन बांधकामाबाबतचा किंवा दुरूस्ती बाबतचा ठराव मंजुर झाल्या नंतर पुन्हा एकदा ग्रामसभा बोलावली जाते व या सभमधे गावातील शंभरच्या वर लोकांना बोलावले जाते व निवडणूक घेवून सात, नऊ, किंवा अकरा लोकांची समिती निवडली जाते व गावपातळीवर या समितीची नेमणूक झाल्यानंतर या लोकांची नावे देवस्थान व्यवस्थापन समितीला कळवली जातात. गावपातळीवरच्या समितीचा कार्य करण्याचा कालावधी साधारण ३ वर्षे असतो.

नेमणूक झालेल्या उपसमितीने मुख्य समितीचे नियम व अटीस पात्र राहून देवालयाचे बांधकाम व इतर स्थानिक व्यवस्था जी करावी लागेल ती कसलाही पगार अथवा मेहताना न घेता करण्याची आहे. या सदस्यांसाठी देवस्थान व्यवस्थापन मंडळ एक नियमावली प्रसिध्द करते ही नियमावली सर्वच गावच्या नेमलेल्या उपसमितींना सारखीच असते. ही नियमावली पुढील प्रमाणे असते.

नियमावली :-

१] सहकारी बँन्केच्या शाखेत खाते उघडणे व खाते क्रमांक देवस्थान व्यवस्थापन समितीला कळवणे.

२] देवालयाचे बांधकाम करावयाचे असल्यास देवालयाचे चारी बाजूची सद्यस्थिती दाखवणारे फोटो [ आतील देवालयाचे व देवालयाच्या बाहेरील भागाचे] घेवून ते फोटो निगेटिव्हसह लवकर देवस्थान व्यवस्थापन मंडळाकडे पाठविणे. गावामधून वर्गणी गोळा करण्यासाठी इकडून दिलेल्या नमुन्यात पावतीपुस्तके छपाई करून घेण्याचे आहेत.

३] या नियमात व अटीमधे फेरफार व सुधारणा झाल्यास ते उपसमितीवर बंधनकारक राहील.

४] सदर उपसमितीचे कोणतेही नियमबाहय वर्तन केल्यास देवस्थान व्यवस्थापन समिती कोणतीही पूर्व सूचना न देता व कोणतेही कारण न दाखवता ती उपसमिती बरखास्त करण्याचा अधिकार देवस्थान व्यवस्थापन समिती यम यांना राहतो.

तसेच या उपसमितीची मुदवाढ परत ३ वर्षाची दिली जाते. ही उपसमिती आपल्या गावातील देवालयाचे नवीन बांधकाम किंवा दुरूस्ती करणाऱ्या दृष्टीने पाडले उचलते व खाजगी वास्तुशिल्पास किंवा बांधाकाम अभियंत्या कडून टेंडर भागवले जाते. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीमधे जे वास्तूशिल्पास व अभियंते नोकरीस आहेत ते त्या गावामधे जातात.

व नवीन बांधकाम किंवा दुरूस्तीसाठी किती खर्च येईल या संबंधी एक एस्टिमेंट तयार करतात. हे एस्टिमेन्ट डिस्ट्रीक्ट शिडयुल रेट याप्रमाणे म्हणजेच सरकारने सार्वजनिक बांधकामाबाबतचे २८ विभाग पाडले आहेत यातील प्रत्येक विभागाचे वेगवेगळे दर सरकारने ठरवून दिलेले असतात. त्याप्रमाणे हे एस्टिमेट त्या देवालयाच्या बांधकामाबाबतचे केले जाते. व जेंव्हा उपसमितीकडून एखादया खाजगी व्यवसायीकाकडून टेंडर येते त्यावेळी त्याच्या टेंडर मधील व देवस्थान व्यवस्थापन समितीने केलेले टेंडर यांचा खर्चाचा आकडा एकच असला किंवा कमीत कमी खर्चात उत्तम बांधकाम करणा-या व्यावसायिकाचे टेंडर मंजूर केले जाते.

यानंतर देवस्थान व्यवस्थापन समिती व गावपातळीवरची उपसमिती यामध्ये एक करार केला जातो. हा करार कोणत्या पध्दतीनुसार केला जातो ते पुढीलप्रमाणे. .....

करारामधील अटी अशा .....

१] मंजूर प्लॅन एस्टिमेंटप्रामणे बांधकाम करून एस्टिमेटची माहिती घेतली या गेली पाहिजे.

२] बांधकाम पी.डब्लूयू. डी स्पेसीफिकेशन प्रमाणे करून स्पेसीफिकेशन ची माहिती करून ध्यावी.

३] बांधकाम सुरु होण्यापासून ते पूरे होण्यापर्यंतची तारीख नमूद केली जावी.

४] देवस्थान व्यवस्थापन समिती या बांधकामास मंजूर करेल ती रक्कम देवस्थान व्यवस्थापन समितीकडून ज्या हप्त्यात मिळेल त्या हप्त्यात स्विकारली जावी व याच कामासाठी तीचा वापर केला जावा. मंजूर झालेली रक्कम देवस्थान व्यवस्थापन समितीकडून घेतल्यानंतर पुन्हा याच कामाकरता जादा मदत मिळण्याबद्दल मागणी केली जाणार नाही.

५] बांधकामाच्या कामाबाबत काही मतभेद निर्माण झाले तर देवस्थान व्यवस्थापन समितीचा निर्णय अखेरचा मानला जावा. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा वाद निर्माण करणार नाही असे लिहून घेतले जाते.

६]  सदरहू बांधकाम पूर्ण झाल्यानंतर देवालयावर अगर इमारतीवर अथवा त्यापासून मिळणा-या उत्पन्नावर आपला कोणत्या ही प्रकारे हक्क संबंध राहणार नाही. या नवीन बांधलेल्या देवालयावर सरकारच्या वतीने पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती कोल्हापूर यांची संपूर्ण मालकी राहते.

७]  या बांधकामाकरता जमा होणा-या व खर्च होणा-या रकमांचे हिशोब आम्ही व्यवस्थितरित्या ठेवू व ते हिशोब आम्ही देवस्थान व्यवस्थापन समितीकडे पुढील बांधकामाबाबतची मदत मागणी करताना त्या अर्जासोबत सादर केले जावेत.

८]  बांधकाम देवस्थानाकडील उपसमिती उप अभियंता यांच्या सुचनेनुसार व मार्गदर्शनाखाली पार पाडले जावे.

९]  बांधकामाबाबत काही दोष राहिले असतील तर ते गावपातळीवरील उपसमिती स्वखर्चाने दुरूस्त करून घेईल. यासाठी जादा रक्कम देवस्थान व्यवस्थापन समिती कडे मागितली जाणार नाही.

१०]  सदरहू देवालयाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर देवालय बांधकामसाठी झालेल्या खर्चाची व देवस्थान व्यवस्थापन समिती या नावाची पाटी २ x १ या मापाची बसवून घेवू.

या प्रमाणे अटी व शर्ती मान्य करून देवालयाचे बांधकाम उपसमितीने पूर्ण करावयाचे आहे. देवस्थान व्यवस्थापन समितीने घातलेल्या सदरहू अटी व शर्ती या उप समितीवर व नियुक्तदारावर बंधनकारक राहतील. म्हणून वरील प्रमाणे करारपत्र देवस्थान व्यवस्थापन समिती उपसमितीकडून करून घेते.

या प्रमाणे करार झाल्यानंतर जसजसे बांधकाम होईल त्यानुसार समितीकडील अभियंते त्या त्या गावी जावून बांधकामचे निरिक्षण करतात. व

बांधकाम जसजसे होइल त्या प्रमाणे त्या बांधकामासाठी लागणारी रक्कम मंजूर करण्यास समितीला सांगीतले जाते.

रक्कम मंजूर करतानाही देवालयाच्या संपूर्ण बांधकामासाठी असणारी रक्कम मंजूर न करता एक चतुर्थांश रक्कमच मंजूर केली जाते.

वरील प्रमाणे गावपातळीवरच्या देवालयाचे बांधकामाबाबतचे समितीचे धोरण असते.

२] करवीर निवासिनी व जोतिबा या देवालयांच्या बांधकामाबाबतचे देवस्थान समितीचे धोरण पुढील प्रमाणे :-

ही दोन देवालये पश्चिम महाराष्ट्रातील अत्यंत प्रसिध्द अशी देवालये आहेत. यांचे बांधकाम दुरूस्ती करण्यासाठी बाहेरील खाजगी व्यावसायिकांकडून टेंडर मागवली जातात व देवस्थान मंडळाने तयार केलेले एस्टिमेट व खाजगी व्यावसायिकांचे एस्टिमेंट मधील खर्च सारखा असेल उत्कृष्ट बांधकाम असेल नवीन कल्पनांचा वापर करणा-या व्यावसायिकांचे टेंडर मंजूर केले जाते. व देवस्थान व्यवस्थापन फंडातून रक्कम काढून खर्च केला जातो.

# प्रकरण ४ थे

## पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीचा उत्पन्न आणि खर्चाचा आकृतीबंध :-

### ऐतिहासिक मागोवा :-

प्राचिन देवस्थानांना त्यांचा नित्य नैमित्तीक खर्च भागवला जावा म्हणजेच देवाची नित्यपूजा व्हावी, देवाचा उत्सव, जत्रा वगैरे नित्यनियमाने पार पाडाव्यात देवालयाची रोजची झाडलोट, दिवाबत्ती, नैवेद्य वगैरे गोष्टी नित्य चालू राहण्यासाठी गावतल्या काही प्रमुख देवस्थानांना त्या त्या काळी जमिनींची उत्पन्ने असत. त्यानुसार त्या जमिनीच्या दरवर्षी निघणाऱ्या उत्पन्नातून त्या त्या देवस्थानांचा नित्य नैमित्तीक खर्च भागवला जात असे. या जमिनी देवालयाचे वहिवाटदार, किंवा जे व्यवस्था पहात असतील त्यांच्याकडे लावणी, संवणीसाठी देण्यात आलेल्या होत्या.

पूर्वी हिशोबाद, जमाखर्च , बेरजा किंवा ताळेबंद वार्षिक होता. अगदी पहिला सुहुर सन ११७८ चा आहे. नंतर ११७९, ११८८, ११८९, ११९१ – ९४, १२१६, १२१७, १२३२, १२४२, १२४६, १२४८, १२४९; १२५१, १२६२ या सालाचे व शेवटचा कु. १२६३ चा आहे. यात जमेकडे ऐन जमा व हासील अमल आणि खर्चाकडे ऐन खर्च व सर्व खर्च अमल असे प्रत्येकी दोन प्रकार सांगितले आहेत. मोठया देवस्थानांच्याच बाबतीत हे हिशोब ठेवले जात होते. मुख्यत: कोल्हापूर जिल्हयातील करवीर निवासीनी या देवस्थानाच्या बाबतीतच हे हिशोब दिसून येतात. ऐन जमेकडे देवीपुढे येणारे रोख रुपये, खर्दा, दागिने, सतगे, सोने – चांदी धान्य नारळ इत्यादींची नोंद असून हासिल अमलात लक्ष्मीकडील वस्तू विकून आलेल्या पैशाची किंवा पैसे खर्च करुन घेतलेल्या तेलधान्यांदींची नोंद झाली आहे. अशीच स्थिती

ऐन खर्च व सर्फ अमल यांची आहे. ऐन खर्चात प्रत्यक्ष देवीसाठी झालेला नक्दी व जिनसी खर्च असून सर्फ अमलमधे वस्तू विकत घेण्यासाठी झालेला खर्च किंवा वस्तूंचा विक्रीस्म खर्च यांचा समावेश केला आहे. या सर्व ताळेबंदातील जमा व खर्च यातील प्रत्येक नोंद तपासून त्यापैकी महत्वाच्या नोंदी व त्यातून निघणारी निगमने सांगणे कठीण काम आहे.

ताळेबंदादी कागदावरून एक गोष्ट चटकन डोळ्यात भरते ही की, मराठी राजवटीमुळे जिकडे तिकडे स्थिरस्थावर झाल्यामुळे महालक्ष्मीकडील जमा खर्च सालोसाल वाढत गेलेला दिसतो.

प्रत्येक वस्तूच्या नशिबात जिर्णत्व व नाश हे असल्याकारणाने तो नियम मूर्तीनांही लागू झालेला दिसून येतो. मूर्तिचीही नैसर्गिक किंवा मानव निर्मिती मोडतोड झालेली आहे. उदा :- सु. ११७९ [ इ.स. १७७८ - ७९ ] करवीर निवासीनीचे प्रभावळ व सिंह यांना लोखंडाचे मोळे बसवले गेले. सु. ११८९ [ इ.स. १७८८-८९ ] जय विजय यांच्या मूर्ती मोडल्या होत्या त्यांना वज्रलेप करण्यासाठी खर्च करण्यात आला. लोखंड व पोलादचे खिळे करून हातापायात घालून बसवण्या बद्दल कित्तापा कासार २ /११ [ दोन रु. ११ आणे ] दिले. यासाठी पोलाद दोन शेरे आणि मालवणी लोखंड एकोणीस शेर लागले. वज्रलेपासाठी डोळसे दोन शेर साधी लाख एक शेर, सोन लाख अर्धा शेर, राळ पावशेर, गुळ सहा शेर, तीन हजार बिब्यांचे तेले तेल, एवढया वस्तू वापरलेल्या दिसतात. इ.स. १७९१ - ९२ मधे जयविजयाचा हात मोडल्याबद्दल वज्रलेप झालेला होता. याबाबत उल्लेख मिळालेला दिसतो. देवालयाच्या काही भागास व शिखरास चुना देत आणि चित्रेही काढत. सुहार ११९१ [ इ.स. १७९०-९१ ] मधे अशा प्रकारे चुना लावण्या बद्दल एक रुपया खर्च पडला असून चित्रांसाठी विविध पदार्थ खरेदी केले आहेत. त्यात डिंक, हरताळ, हुरमोज, हिंगूळ, सफेती, निळ, लाखे, मध पिवडी साबण, जंगल, शेंदूर एवढे रंग व इतर जिन्नस सांगितले आहेत.

रंगपंचमीस रंग म्हणून जंगल, शेंदूर, सफेती, नीळ एवढयांचा उल्लेख इ.स. १८३१ - ३२ च्या ताळेबंदात आला आहे. नवरात्रातील नवमीस खांडा पूजेच्या वेळी दरवर्षी पाच बकरी लागत [ इ.स. १७९२ - ९४ ] मधे नवरात्र प्रसंगी बिदागी व इतर खर्च झाला तो हरिदास १५, डवरी गोसावी २, गोंधळी २, कलावंतीचा ताफा २५, मृदंग ५, टाळकुटे १, सलगसमंधी २५, पानसुपारी विडयास २५, मिळून शंभर रुपये दाखवला आहे. गोपिकाबाई पेशवे, यांनी पावणे चोवीस तोळे गुंजाचे चूडे महालक्ष्मीस दिले. तसेच दुसरा शिवाजी यांनी कोल्हापूर तर्फेतील उपगाव मोकासा म्हणून दिले. फाल्गुन वद्य ५ च्या राजपत्रात लक्ष्मीची पूजा व उत्सव व नंदा दीप नीट चालावा यासाठी कुरडु गाव इनाम दिल्याचा उल्लेख आढळतो. कोल्हापूरच्या महालक्ष्मीस नैवेद्यासाठी कोल्हापूरच्या सरकारी - आदिलशाही सादीलवार बाब खात्यातून सालोसाल दहा होन मिळत असत. महालक्ष्मीच्या तीनही वेळच्या नैवद्यासाठीही जमीन दान केली आहे.

अ] <u>देवस्थान व्यवस्थापन समिती [ मंडळाचे ] उत्पन्न</u> :-

देवस्थान व्यवस्थापन समितीच्या उत्पन्नाच्या बाजू प्रामुख्याने पुढील प्रमाणे आहेत.

१] जमिनीच्या खंडाचे, लावणी, लीलावाचे उत्पन्न थोडक्यात देवस्थानच्या कक्षेतील येणा-या देवांना मिळालेल्या इनाम जमिनी, त्यापासून मिळणारे उत्पन्न.

२] देवस्थान समितीच्या अखत्यारित असलेल्या देवळामधे कोल्हापूर जिल्हयातील काही प्राथमिक शाळा भरतात त्याचे मिळणारे आहे.

३] गुंतवणूकीवरील व्याज व बचत खात्यावरील व्याज

४] जमिन विक्री व गवत लिलाव.

५] इमारत भाडे

६] देणगी पेटया / मदत पेटया

७] दुकान भाडे [ गाळे डिपॉझीट ]

८] करवीर निवासीनीच्या साडया विक्री

९] करवीर निवासीनी महाप्रसाद विक्री

१०] करवीर निवासीनी प्रसाद विक्री

११] करवीर निवासीनी घंटा देणगी

वरील प्रमाणे कोल्हापूर जिल्हयातील देवस्थानांच्या उत्पन्नाच्या बाजू आपल्याला दिसून येतात.

१] <u>जमिनीच्या खंडाचे उत्पन्न</u> :- १० टक्के व्यवस्थापकीय चार्ज

१९९१ - ९२ च्या अंदाजपत्राकानुसार ३,००,०००/- रू. खंडाचे उत्पन्न देवस्थान व्यवस्थापन समितीस मिळालेले आहे. कोल्हापूर जिल्हयातील असलेल्या देवस्थान जमिनीचा खंड अल्प प्रमाणात असून त्यात वाढ करण्याच्या दृष्टीने संबंधीत कुळांना नोटीसा काढून कार्यालयात बोलावून खंडाची रक्कम वाढवून ती रक्कम बाकीसह वसूल करण्याची कारवाई करण्याचे काम चालू आहे. तसेच ज्या देवस्थान जमिनी पड आहेत त्या कब्जात घेवून त्याची विक्री करून त्या पासूनही उत्पन्न वाढत आहे. त्यामूळे साहजिकच उत्पन्नाच्या १० टक्के उत्पन्न [ मॅनेजमेंट ] व्यवस्थापकीय फंडात जमा होवू लागले आहे. तरी जमा होणाऱ्या उत्पन्नवर १० टक्के प्रमाणे होणारी रक्कम सदर दाखल केली आहे.

२] शाळा भाडे व इमारत भाडे :-

देवस्थान समितीच्या अखत्याराखाली असलेल्या देवळामधे कोल्हापूर जिल्हयातून प्राथमिक शाळा भरत आहेत. सदर शाळांचे भाडे फारच अल्प प्रमाणात मिळते. त्यामधेही भाडेवाढ होणे गरजेचे ठरते. तसेच देवस्थानच्या इमारतीमधे दूधाच्या सोसायटीचे ऑफीस, विविध कार्यकारी सोसायटयांची कार्यालये असून सध्या ब-याच जागेचे भाडे देवस्थान व्यवस्थापन समितीत जमेस येत नाही. तरी त्या त्या संस्थांना नोटीसा काढून भाडेवाढ व वसूली करण्याचे काम सध्या चालू केलेले आहे. हे भाडे वर्षाला जवळ जवळ १०,०००/- रुपये इतके जमा होते.

३] गुंतवणूकीवरील व्याज व बचत खात्यावरील व्याज :-

| २४ | विकास आराखडा व सहभाग | -- | ---- | १०,६०,००० | ------ | ----- | ५,००,००० | (+) ५,००,००० | ------ |
| २५ | धर्मशाळा खर्च | ----- | ---- | ३३४ | ३२६ | १,००० | १,००० | ----- | ५,०० |
| २६ | दुकान गाळे | ----- | ---- | ----- | ---- | ११,००,००० | ११,००,००० | ----- | ११,००,००० |
| २७ | पालखी | ----- | ---- | ----- | ---- | १२,००० | १२,००० | ----- | १५,००० |
| २८ | प्लॅटेशन | ४१९ | ३८३ | १,०२० | ७५० | १,००० | १,००० | ----- | १,००० |
| २९ | जमीन विक्री परत | ----- | ----- | १,०५,४०८ | ----- | ----- | ----- | ----- | ------ |
| ३० | श्री केदारलिंग प्रवेश द्वार कमान केली. | --- | ----- | ----- | ---- | ----- | ----- | ----- | ५०,००० |

191
+८५ 185

(३७)



| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | खर्च | | ६,२६,६३९/- | १७,३६,५००/- | २४,११,०००/- | ६,७४,५०० | १९,७३,५०० |
| | | | अखेर शिल्लक | (-) | २,३४,९८५/- | (-) ८७,०९९/- | ६४,४१६/- | — | — |
| | | | एकुण | (-) | ८,६१,६२४/- | १६,४९,४०१/- | २३,३६,५८४/- | ६,७४,५०० | १९,७३,५०० |

सचिव
देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर

श्री. केदारलिंग देवस्थान वाडी रत्नागिरीचे सन    चे दुरुस्त   व सन    चे मुळ अंदाजपत्रकासंबधीची टिपणी

## जमेची टिपणी

१,००,०००/-   १] ब्लॉक भाडे – श्री. कडील माळावरील दुकानाकरिता चैत्र या महिन्यात ब्लॉक लिलाव करावा लागणार असून त्या करता अंदाजात जमा होणारी रक्कम दाखल केलेली आहे.

१,२५,०००/-   २] देणगी – वाडी रत्नागिरी येथील जोतिबा विकास कामाअंतर्गत तिसरी टप्पे व इतर सुधारणा संबंधीची कामे सुरु असलेने भक्तांचे कडून देणगी रकमेत वाढ होत आहे. सदर देणगी करता चालू बजेटमध्ये तरतूद केलेली आहे.

११,००,०००/-   ३] दुकान भाडे डिपॉझीट – श्री चे माळावरील शॉपींग कॉम्प्लेक्स बांधण्याची योजना समितीच्या विचाराधीन आहे. हे काम समितीने हाती घेतल्यास ६२ दुकान गाळ्या पोटी प्रत्येक गाळ्यास रक्कम रु.२०,०००/- घेतल्यास परिसर सुधारणा कामी व कॉम्प्लेक्स बांधकामा करता रक्कम उपलब्ध होणार आहे. तरी सदरची रक्कम अंदाजात धरलेली आहे.

सचिव
देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र

## खर्चाची टिपणी

५,००,०००/-   १] विकास आराखडा विभाग– श्री. जोतिबा परिसर विकास आराखडा निधीची आवश्यकता असलेने मा. जिल्हाधिकारी यांची इच्छे कळवले आहे देवस्थान समितीने सहभाग रक्कमेचा आगाऊ हप्ता दिलेला आहे.

१५,०००/-   २] चांदीची गलबी – श्री. कडील चांदीची गलबी करुन घेणेचे टेंडर समितीने मंजूर केले असून त्यासाठी होणाऱ्या खर्चाची तरतूद अंदाजपत्रकात दाखवण्यात आलेली आहे.

५०,०००/-   ३] श्री. केदारलिंग प्रवेशद्वार – श्री. जोतिबा डोंगरच्या पायथ्याशी असणाऱ्या [केर्ली] या गावच्या हद्दीवर एक प्रवेश द्वार कमान बांधण्याची योजना समितीच्या विचाराधीन आहे. सदर बांधकामाकरता ग्रामपंचायत केर्ली यांनी जागा उपलब्ध करुन देण्याचे ठरविले आहे. या कामी होणाऱ्या खर्चाची तरतूद अंदाजपत्रकात केलेली आहे.

2B

श्री.करवीर निवासिनी देवस्थान

## श्री. करवीर निवासिनी देवस्थान कडील सन १९९१-९२ चे दुरुस्त व सन १९९२-९३ चे मूळ

| अ.नं. | जमेचे खाते | मागील तीन वर्षाचे तरासरी ८८-८९ | ८९-९० | ९०-९१ | माहे डिसेंबर ९१ अखेर प्रत्यक्ष जमा | सन १९९१ चे मूळ | दुरुस्त | दुरुस्त बजेट पत्रकाल कमी/जास्ती | १९९२ चे मूळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | जमिनबाब | १,०५१/- | १,९०१ | १,३२० | ---- | १,००० | १,००० | ---- | १,००० |
| २ | मदत पेटी | ६,७९,७६२ | ६,९५,६१६ | ८,५८,१८६ | ६,७३,४५५ | ७,५०,००० | १०,००,००० | (+) २,५०,००० | १०,००,००० |
| ३ | दुकानभाडे | ३२,५४३ | ३४,२०० | ३१,६४२ | १३,७१० | ५०,००० | २५,००० | (-) २५,००० | १,००,००० |
| ४ | खिणधिदार ] | | | | | | | | |
| ५ | देणगी | १,२७,२९५ | १,२६,८८९ | १,५४,०६५ | ८२,११६ | १,२५,००० | १,२५,००० | ---- | १,२५,००० |
| ६ | किरकोळ/फोटोविक्री ] | | | | | | | | |
| ७ | साडी विक्री | २,२५,२९६ | १,४४,१६१ | १,९४,४३३ | १,२२,६२८ | १,५०,००० | २,००,००० | (-) ५०,००० | २,००,००० |
| ८ | दुमालदार रसद | ---- | ---- | ---- | ---- | ३०,००० | ३०,००० | ---- | ३०,००० |
| ९ | मुदत ठेव जमा | ---- | २,६९,४६५ | ३,०९,१०४ | ३,९४,००० | ---- | ३,९४,००० | (+) ३,९४,००० | ---- |
| १० | गुंतवणूकीवरील व्याज ] | | | | | | | | |
| ११ | बचत खात्यावरील व्याज | २,८७,२८५ | २,१४,७६० | २,४६,८८६ | १,४२,०८६ | २,२८,५०० | २,२८,५०० | ---- | ३,१७,००० |
| १२ | पूजा विधी ठेव | ---- | ---- | ४१,१९८ | १,२५,०१८ | ---- | १,५०,००० | (+) १,५०,००० | ---- |
| १३ | देवताकृत्य देणगी | ३,१८,०५८ | ३,४९,५६४ | ३,६२,१७४ | २,०८,९७५ | ३,००,००० | ३,००,००० | ---- | ३,००,००० |
| १४ | महाप्रसाद देणगी | ---- | ---- | ---- | ७१,१६६ | ---- | ७५,००० | (+) ७५,००० | १,००,००० |
| १५ | प्रसाद विक्री | ---- | ---- | ६३,०६८ | ४३,०५८ | ५०,००० | ५०,००० | ---- | ७५,००० |

— २ —

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | प्रा. फंड | ——— | ——— | ——— | १३,१३५ | ——— | १८,००० | (+) ८,००० | २०,००० |
| १७ | प्रा. फंड अॅडव्हान्स | ——— | ——— | ——— | १७,७७७ | ——— | २०,००० | (+) २,००० | २०,००० |
| १८ | नोकर बॅंक कर्ज | ——— | ——— | ——— | १,२०० | ——— | १,२०० | १,२०० | ——— |
| १९ | अनपेक्षीत | ६,३८८ | १,७०,००० | १,७२९ | ५,६०० | ——— | ६,००० | (-) २,००० | ५,००० |
| २० | नगार व टेलेफोन वसूली | ३२९ | ५३७ | १,३८६ | १४० | १,००० | १,००० | ——— | १,००० |
| २१ | सि. पी. आर. डोल | ——— | ——— | ——— | ——— | ——— | ——— | ——— | ——— |
| २२ | धर्मशाळा बांधकामाची रक्कम घांटा देणगी | ——— | ——— | ——— | ६३,७४० | ——— | ७५,००० | (-) ७४,००० | २५,००० |
| | | जमा | | | १९,७८,६०१ | १६,८५,५०० | २६,९९,७०० | १०,१४,२०० | २३,०९,००० |
| | | अव्वल शिल्लक | | | २९,४८,२०२ | १३,८१,७५० | १४,१७,२४० | ——— | ——— |
| | | एकूण | | | ४९,२६,८०३ | ३०,६७,२५० | ४१,१६,९४० | १०,१४,२०० | २३,०९,००० |

सचिव
देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर

अंदाजपत्रका संबंधी

| अ.नं. | खर्चाचे खाते | मागील तीन वर्षांची सरासरी ८८-८९ | ८९-९० | ९०-९१ | माहे डिसेंबर ९१ अखेर | सन १९९१ चे मूळ | दुरुस्त | दुरुस्त बजेट मधील कमी/जास्त | सन १९९२ चे मूळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | म्युन्सीपल कर | ११,३१३ | १४,४९६ | १६,७६४ | ------ | २०,००० | २०,००० | ------ | २०,००० |
| २ | नित्य खर्च | १,०६,०८४ | ३,१६,४६९ | १,४१,४८७ | ९२,३९३ | ३,००,००० | ३,००,००० | | ३,००,००० |
| ३ | नवरात्र उत्सव खर्च | ------ | ------ | १,२९,४४६ | ७२,२८८ | | १५,००० | (+) २५,००० | १,२५,००० |
| ४ | इले. बील | १,२०,३९८ | १,२२,०३१ | ८७,१४७ | ९९,४२२ | १,००,००० | १,२०,००० | (+) २५,०० | १,२५,००० |
| ५ | इले. साहित्य खरेदी | ------ | ------ | १,५५८ | १२,७३८ | | १५,००० | | १५,००० |
| ६ | नोकर पगार व बोनस | ३,०७,६११ | ३,३६,२४६ | ३,७७,९७६ | ३,०३,५६६ | ३,५०,००० | ४,२५,००० | (+) ७५,००० | ४,२५,००० |
| ७ | नोकर प्रा. फंड वर्गणी | ------ | ------ | ------ | १२,१३५ | ------ | १८,००० | (+) १८,००० | २०,००० |
| ८ | नोकर प्रा. फंड अॅड. | ------ | ------ | ------ | १७,७७५ | ------ | २०,००० | (+) २०,००० | २०,००० |
| ९ | नोकर पोशाख | १,७३२ | ३९६ | ४,४२० | ३,११४ | ------ | ४,००० | (+) ४,००० | ५,००० |
| १० | नोकर प्रवास भत्ता | ५२९ | ३०३ | ९५५ | १५४ | ५०० | ५०० | ------ | ५०० |
| ११ | नोकर वैद्यकीय भत्ता | ------ | ४,३१६ | ३,३४८ | ------ | ५०० | ५०० | ------ | ५०० |
| १२ | ग्रॅच्युटी | ------ | ४,५८७ | ------ | १०,१५२ | १०,००० | ११,००० | (+) १,००० | १०,००० |
| १३ | स्टेशनरी | ३७५ | २,००७ | ------ | ------ | १,००० | ३,००० | (+) २,००० | ३,००० |
| १४ | रथ दुरुस्ती | ------ | ३५० | ------ | ------ | ------ | ------ | ------ | ५,००० |
| १५ | गवई हत्यार दुरुस्ती | ------ | ------ | ------ | ------ | १०० | १०० | ------ | १०० |

------ २

१९१

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | पाणीहंशील | ९७५ | १,८०० | २,४४४ | ७३२ | २,००० | १,००० | (-) १,००० | २,००० |
| १७ | विमा पॉलीशी | १,०५० | १,०५० | १,०५० | १,०५० | १,०५० | १,०५० | — | १,०५० |
| १८ | १० टक्के मेंने फंडास | १,४०,२२४ | १,७६,७६८ | १,७६,९६० | १,९०,३५० | २,००,००० | १,९०,३५० | (-) ९,०० | २,००,००० |
| १९ | स्टेशनरी व छपाई | १३,७७३ | १९,७६५ | — | ७८० | ५,००० | ५,००० | — | ५,००० |
| २० | [illegible]/किरकोळ | [illegible] | ४,३१९ | २,५५८ | ३०९ | १,५०० | १,००० | (-) ५०० | १,००० |
| २१ | टेलीफोन | ५,८४५ | ३,९१० | ४,८२३ | ८,९८६ | ५,००० | १०,००० | (+) ५,००० | ५,००० |
| २२ | शिखर रंगकाम | १८,७८९ | २०,०३३ | — | — | २०,००० | — | (-) २०,००० | २०,००० |
| २३ | पोस्टेज | १,९८८ | २,४४२ | ५०० | ८,४०६ | १०,००० | १०,००० | ० | २५,००० |
| २४ | जनरेटर व झुंबर | ८९५ | ३,२३४ | — | — | ५,००० | १,००० | (+) ४,००० | २,००० |
| २५ | कारंजी मेन्टेनन्स | २,०२६ | ९९८ | १,०२९ | — | २,००० | २,००० | — | ३,००० |
| २६ | अनपेक्षित | — | — | — | — | — | — | — | — |
| २७ | अंशदान निधी | — | — | — | — | — | — | — | — |
| २८ | घंटा खरेदी | — | — | — | — | १,००,००० | १,००,००० | — | — |
| २९ | प्रसाद काउंटर | — | — | — | ५,१५७ | — | ६,००० | (+) ६,००० | ५,००० |
| ३० | नोकर बँक कर्ज | — | — | — | १,२०० | — | १,२०० | (+) १,२०० | — |
| ३१ | फोटो खर्च | २५,३१३ | ८,११० | ६,७४१ | ९८० | ५,००० | ५,००० | — | ५,००० |
| ३२ | गुंतवणूक | ४,२३,०७१ | २,९३,९९५ | ३,४७,४५० | ४,९६,८५१ | — | ५,००,००० | (+) ५,००,००० | — |
| ३३ | प्रसाद खर्च | — | — | — | — | ४०,००० | ४०,००० | — | ५०,००० |
| ३४ | किरकोळ दुरुस्ती | — | — | ४,००८ | ५,२७६ | — | ६,००० | (+) ६,००० | १०,००० |

— ३ —

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३५ | बँक कमिशन | ——— | ——— | ——— | १४ | ——— | १.५० | ५० | ५० |
| ३६ | सी.पी.आर | ——— | ——— | १०,००,००० | ——— | ——— | ——— | | |
| ३७ | धर्मशाळा मदत गाभारा स्पेशल रिपेअरी मार्बल व ग्रानाईट | ——— | ——— | ——— | ——— | ——— | ——— | ——— | ५०,००० |
| | | खर्च | | | १३,४५,९०९ | ११,७८,६५० | १८,४१,७५० | ६,६०,१०० | १३,४८,२०० |
| | | अखेर शिल्लक | | | ३५,८०,८९४ | १८,८८,६०० | २२,७५,१९० | ३,५२,१०० | ९,६०,८०० |
| | | एकुण | | | ४९,२६,८०३ | ३०,६७,२५० | ४१,१६,९४० | १०,१४,२०० | २३,०९,००० |

सचिव
देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर

(८) (५१)

श्री.करवीर निवासिनी देवस्थानचे सन चे दुरुस्त व सन चे मुळ अंदाजपत्रका संबंधीची टिपणी

## जमेची बाजू

१०,००,०००/- १] मदत पेटी - श्री.करवीर निवासिनी देवस्थानकडे ठेवण्यात आलेल्या पेटयांचे उत्पन्नात दिवसे दिवस वाढ होत चाललो आहे. डिसेंबर ९१ अखेर पर्यंत जवळ जवळ पावणे सात लाख रुपये जमा झाले आहेत. महिन्याला सरासरी ऐंशी हजार पर्यंत रक्कम जमा होत आहे. देवस्थान समिती तर्फे चालू केलेल्या सुधारणा तसेच नवरात्र उत्सव रथोत्सव सारखी उत्सव म्हणजे पश्चिम महाराष्ट्रा तील एक आकर्षण होऊन बसलेले आहे. याचा विचार करता चालू आर्थिक वर्षाकरता वरील रक्कमेची तरतूद सूचवलेली आहे.

१,००,०००/- २] दुकान भाडे - श्री.करवीर निवासिनी देवस्थानचे आवारांत पूजा साहित्य विक्रीची दुकाने आहेत. त्याचे भाडे देवस्थानकडे जमा होते. परंतु सदरचे भाडे हे फारच नाममात्र आहे. दुकानदारांचे पूजा विषयी साहित्याची विक्री मोठया प्रमाणात असून त्यामानाने भाडे फारच कमी आहे. यासाठी देवस्थान समितीने भाडेवाढ सूचवण्यासाठी समिती नियुक्त केली होती परंत त्यासंबंधी भाडेवाढ

## खर्चाची बाजू

१,२५,०००/- १] नवरात्र उत्सव - श्री करवीर निवासिनी देवस्थान कडील नवरात्र उत्सव फार मोठया प्रमाणावर साजरा होत असतो. नवरात्रामध्ये [illegible] विजेचे रंगवणी लाईटींग करणे पालखी सोहळा, प्रसाद विक्री, महाप्रसाद इत्यादी वर बराच खर्च होत असतो. त्याचप्रमाणे देवस्थान समिती मार्फत रोज पालखी नंतर प्रसिध्द गायक लोकांचे गायनाचे कार्यक्रम नऊ दिवस आयोजित केले जातात. त्यामुळे झालेल्या खर्चाचा विचार करता चालू बजेटला सदर रक्कमेची तरतूद सूचवली आहे.

५,०००/- २] रथ दुरुस्ती - श्री करवीर निवासिनी देवचा रथोउत्सव कार्यक्रम दरवर्षी चैत्री पौर्णिमेला साजरा होत असतो. सदर दिवशी देवीची उत्सव मूर्ती कोल्हापूर शहरातून रथातून नगरप्रदक्षिणा करून करून येत असते. तरी सदरचा रथ हा [illegible] रंगवलेला होता. रथाचे घेणे गरजेचे आहे. चालू

जमेची बाजू
==========

झालेली नाही. प्रत्येक दुकानाचे भाडे जवळ जवळ दरमहा रु. पांचशे झाल्यास उत्पन्नात साहजिकच वाढ होईल. त्यामानाने दरवर्षी म्युनिसपल टॅक्स वाढत आहे. तरी याचा विचार करता दुकानभाडे वाढ होणे गरजेचे आहे. जवळ जवळ बारा वर्षा पूर्वी भाडे वाढ केली होती. त्यानंतर अजून भाडे वाढ केलेली नाही. तरी याचाकरता चालू बजेटला भाडे वाढ मध्ये जादा तरतूद केली आहे.

२,००,०००/- ३] साडी विक्री – श्री. कडे अभिषेका सोबत भक्ता मार्फत ९ वारी, ६ वारी साडी दिली जाते. अशया ब-याच साड्या जमा होतात. तरी सदर साड्या विक्री करुन उत्पन्न वाढवण्याचे धोरण समितीने हाती घेतले आहे. तरी सन १९८५ च्या पूर्वीच्या साड्यावर ५० टक्के डिसकाउंट तसेच १९८५ नंतरच्या साड्यावर ३० टक्के डिसकाउंट देऊन श्री. ची साडी प्रसाद म्हणून भक्तांना देण्याचा उपक्रम हाती घेतला असल्याने देवस्थानच्या उत्पन्नात वाढ होऊन जुन्या साड्या भक्तांना माफक किंमतीत प्रसाद म्हणून मिळत आहेत. त्यामुळे साड्यांची जास्ती मोठया प्रमाणात होत आहे.

खर्चाची बाजू
============

[illegible] ही व्यवस्था [illegible] असलेने त्यासाठी बजेटला तरतूद सुचविलेली आहे

२०,०००/- ३] शिखर रंगकाम – दरवर्षी नवरात्र उत्सवाचे अगोदर शिखराचे व शिखरे तसेच श्री चा गाभारा रंगवण्यात येतो. दोन वर्षापूर्वी [illegible] स्वत:चे खर्चाने सर्व [illegible] केले होते. परंतु मागिल वर्षी रंगकाम केले नसलेने चालू नवरात्री मध्ये पांचही शिखरे गरुड मंडप, रंगकाम करणे जरुरीचे असलेने बजेटला तरतूद सुचवलेली आहे.

१,००,०००/- ४] घंटा खरेदी – श्री. महालक्ष्मी घंटा ही घाटी दरवाजाचे ठिकाणी बसवलेली असून दररोज पाच वेळा सदरची घाट देण्यात येते. जवळ जवळ ९० वर्षापूर्वीची घाट ही नादुरुस्त झाली असल्याने नवीन घंटा खरेदी करण्या करता देवस्थान समितीने डिपोली येथे घंटा करण्यात दिलेली असून त्याकरता इकडून रु. [illegible] हजार व जुन्या देवीस आलेल्या पितळी घंटा सदर घाट तयार [illegible]

## जमेची बाजू

१,००,०००/- ४] महाप्रसाद देणगी - श्री. करवीर निवासिनी कडील अश्विनी पौर्णिमेचा प्रसाद पूर्वी पासून श्री भक्त मंडळामार्फत केला जात असे. परंतु समितीने निर्णय घेऊन समिती मार्फत भक्तांना प्रसाद देण्यात उपक्रम हाती घेतला. त्यासाठी श्री चे आवारात मंडप टाकून गावती स्थाने पैसे व धान्य जमा केली व यावर्षीचा अश्विनी पौर्णिमेचा प्रसाद देवस्थान समिती मार्फत करून या वर्षी पासून उत्पन्नात वाढ झालेली दिसून येईल.

७५,०००/- ५] प्रसाद विक्री - श्री. करवीर निवासिनी देवस्थानकडे नवरात्र उत्सवामध्ये १५ दिवस देवस्थान समिती मार्फत माफक किंमतीत प्रसादाचे बुंदीचे लाडू विक्रीचे चार स्टॉल उभारून विक्री केली जात आहे. तातडीकच येणाऱ्या परगांवच्या व स्थानिक भक्त वर्गात प्रसाद म्हणून योग्य किंमतीत लाडू मिळून त्या द्वारे समितीचे उत्पन्नात वाढ होऊ लागलेली आहे.

## खर्चाची बाजू

करण्या करता निविदा आहेत परंतु अजून घाटा तयार होऊन आली नाही यासरता दोन वेळा समिती सभा व कार्यालयातील स्टाफ मार्फत ... दौरा करावा लागेल आहे ... खर्च दरोज रुपयेची तरतूद केलेली आहे.

-५०,०००/- ५] प्रसाद खर्च ... - श्री तिरुपती चे धर्तीवर दर नवरात्रीचे भक्तांना प्रसाद मिळावा ह्या हेतूने श्री करवीर निवासिनीचे आवारात चारही दरवाजांना प्रसाद विक्री कौंटर टाकून नवरात्र उत्सवात सदर कौंटर द्वारे प्रसाद विक्री चालू आहे. ततेच दररोज एका कौंटरवर प्रसाद विक्री चालू आहे. प्रसादा करता बुंदी लाडू दिले जातात. तरी सदर लाडू करता ताखर, रिफायीन वगैरे करता होणाऱ्या खर्चाची तरतूद केलेली आहे.

— ४ —

## जमेची बाजू

==========

१५,०००/- ६] घंटा देणगी - श्री करवीर निवासिनी देवीची सन १९०२ सालची घंटा सध्या क्रॅक होऊन नादुरुस्त अवस्थेत आहे. सदर घंटा दररोज पांच वेळा दिली जाते. त्यामुळे बऱ्याच वर्षांची घंटा नादुरुस्त असलेने समितीने नविन घंटा घेण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी भक्तवर्गाकडूनही सदर घंटे करता डिसेंबर ९१ पर्यंत जवळ जवळ सावतीने पासष्ठ हजार जमा झाले आहेत. तरी यापुढे रक्कम जमा होईल अशी अपेक्षा आहे.

## खर्चाची बाजू

============

५०,०००/- ६] गाभारा स्टील रिपेअरी [मार्बल व ग्रानाईट] श्री महालक्ष्मी देवस्थानातील गाभारा स्वच्छता व पावित्र्य राहण्याच्या दृष्टीकोनातून आंत संपूर्ण पणे ग्रानाईट फरशी बसविणेचे धोरण समितीने ठरविले आहे त्यासाठी प्राथमिक स्वरूपाची तरतूद दाखविण्यात आलेली आहे.

सचिव
देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर

3 अनि 4
B

शहर कोल्हापूर येथील तीन स्थानिक देवस्थानचे अंदाजपत्रक

नरसोबावाडी ता, शिरोळ,

श्री· जोग अन्नछत्र·

श्री· जोग अन्नछत्र नरसोबावाडी ता·शिरोळ, गुंतवणूकीवरील सन १९९२-९३ मधील व्याजाचा तपशील·

| अ·नं· | गुंतवणूकीचा तपशिल | मुदत ठेव पावती | दर्शनी किंमत | वार्षिक व्याज | गुंतवणूकीची मुदत· |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १] | ३ ٪ कन्व्हर्शन लोन | २२५२१ | ७,४००-00 | ४६२-00 | ११·२·११ |
| २] | श्री· बलभीम को·ऑप·बॅन्क | ८२८ | १८,६००-00 | २,०४५-00 | २१·८·११ |
| | | | २६,000-00 | २,५०७-00 | |

देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर येथील स्थानिक देवस्थानांचे व श्री· नरसोबावाडी ता·शिरोळ येथील श्री· जोग अन्न छत्राचे सन १९९१-९२ चे दुरुस्त व सन· १९९२-९३ चे मूळ अंदाजपत्रक·

| अ·नं· | खर्चाचे खाते | मागील तीन वर्षाची सरासरी ८८-८९ | ८९-९० | ९०-९१ | माहे डिसेंबर ९१ अखेर प्रत्यक्ष खर्च | सन मूळ | चे दुरुस्त | दुरुस्त बजेट मधील कमी/ जास्त | सन ९२ मूळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १· | **श्री·सिध्दी विनायक देवस्थान** | ६१,२०९/- | ८४,५१३/- | ५१,९६६/- | | ५०,०००/- | | | |
| | नित्य खर्च | | | | १७,०००/- | | २०,०००/- | | २५,०००/- |
| | नोकर पगार | | | | १०,२२४/- | | १५,०००/- | | १५,०००/- |
| | उत्सव खर्च | | | | २,३००/- | | ६०,०००/- | ४,०००/- | १०,०००/- |
| | इले· खर्च | | | | २,१००/- | | ३,०००/- | | २,५००/- |
| | सभामंडप बांधकाम | | | | | | | | |
| | १०% मॅनेजमेंट फंड | | | | ६,४४७/- | | ६,५००/- | | ७,०००/- |
| २· | **श्री·दत्त भिक्षालिंग देवस्थान** | ३४,८२७/- | ६६,१३६/- | ४८,४७५/- | | ३०,०००/- | | | |
| | नित्य खर्च | | | | १,८७५/- | | २,५००/- | | ५,५००/- |
| | नोकर पगार | | | | ५,८५३/- | | ८,०००/- | | ८,०००/- |
| | इले·खर्च | | | | १,३६२/- | | १,५००/- | ४,१००/- | १,५००/- |
| | पाणी हंशील | | | | १३१/- | | ३००/- | | ३००/- |
| | उत्सव खर्च | | | | | | १०,०००/- | | १०,०००/- |
| | १०% मॅनेजमेंट फंड | | | | ३,६२७/- | | | | ४,०००/- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३· | <u>श्री·पंचमुखी मारुती देवस्थान</u> | ७,९९३/- | ८,०९८/- | ७,२०२/- | | ८,०००/- | | |
| | नित्य खर्च | | | | ८४२/- | | १,५००/- | | १,५००/- |
| | नोकर पगार | | | | ४,४१९/- | | ३,०००/- | | ३,०००/- |
| | म्युन्सीपल कर | | | | | | ४,५००/- | १,५००/- | १,०००/- |
| | इले· खर्च | | | | | | ३००/- | | ३००/- |
| | १०% मॅनेजमेंट व फंड पार्जित | | | | १८०/- | | २००/- | | २००/- |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | **बिनखांबी गणेश मंदीर** | ३६,६२४/- | ३५,६९६/- | २१,९०२/- | | ३०,०००/- | | | |
| | नित्य खर्च | | | | ७,०८०/- | | ८,०००/- | | ५,२००/- |
| | नोकर पगार | | | | ५,५८५/- | | ८,०००/- | | ५,०००/- |
| | इले. खर्च | | | | ४४४/- | | ५००/- | ६,७००/- | |
| | १०% मॅनेजमेंट फंड | | | | ४,५१७/- | | ४,५००/- | | ५,०००/- |
| | देवालय रंगकाम | | | | २,६१४/- | | २,६००/- | | ३,०००/- |
| ५. | **श्री. बाळूमामा देवस्थान** | | ६,०६३/- | १३,५९६/- | | ११,०००/- | | | |
| | म्युनिसिपल कर | | | | | | ५००/- | | ५००/- |
| | नोकर पगार | | | | ४,९६८/- | | ६,५००/- | | ६,५००/- |
| | इले. खर्च | | | | | | | | |
| | पाणी हंशोक | | | | | | | | |
| | नित्य खर्च | | | | २,८०५/- | | ३,५००/- | | ३,५००/- |
| | १०% मॅनेजमेंट फंड | | | | ५६०/- | | ५६०/- | [+]६०/- | ६००/- |
| ६. | **श्री. जोग अन्न छत्र** | १७७/- | ३०७/- | ३,८११/- | | | | | |
| | नित्य खर्च | | | | | | | | |
| | १०% मॅनेजमेंट फंड | | | | १०२/- | | १०२/- | [-]१०२/- | ३,६००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७. | श्री·नृसिंहवाडी देवस्थान | !. | | | | २५०/- |
| | नोकर पगार | ९,३५३/- | | ११,५००/- | [+]११,५००/- | १२,०००/- |
| | इले·खर्च | ४५३/- | | १,०००/- | [+] १,०००/- | १,०००/- |
| | पाणी | | | १,३००/- | [+] १,३००/- | १,५००/- |
| ८. | श्री·त्रिबोली देवस्थान | | | | | |
| | नोकर पगार | ४,९६८/- | | ६,५००/- | | ६,५००/- |
| | इले· खर्च | ७२०/- | | १,०००/- | | १,०००/- |
| | पाणी खर्च | २,६१८/- | | ३,०००/- | | १,०००/- |
| | उत्सव खर्च | [illegible] | | | | |
| | खर्च | १,०३,३२७/- | १,२९,०००/- | १,९८,९६२/- | ६९, ६२/- | १,५६,७५०/- |
| | अखेर शिल्लक | [-]१३,२०९/- | [+]४,८५४/- | [-]७८,७४६/- | [-]२०,०६२/- | ४०,२५०/- |
| | एकूण | ९०,११८/- | १,३३,८५४/- | १,२०,२१६/- | ४९,९००/- | १,९७,०००/- |

| जमेची टिपणी | | खर्चाची टिपणी | |
|---|---|---|---|
| ५०,०००/- | **१]श्री·सिध्दी विनायक [ओढयावरील] :**<br><br>श्री·सिध्दी विनायक देवस्थानकडे दर महिन्याला संकष्टीस पावती स्माने भक्ताकडून पैसे स्विकारुन प्रसाद दिला जातो· तसेच हया वर्षी श्री·चा नवीन मंडपात वास्तुशांत व श्री· गणेश योग या सारखे धार्मिक कार्यक्रम करुन दररोज चार दिवस होम हवन करुन भक्तांचेमार्फत देणगी स्माने पैसे जमा करुन त्याव्दारे जवळ जवळ पाच हजार लोकांना वास्तशांत व श्री· गणेश याग मार्फत प्रसाद[जेवण] देण्यात आला· सदर कार्यक्रमा करता माहे डिसेंबर ९१ अखेर जवळ जवळ साठ हजार रुपये जमा झाले जमा झालेल्या व धान्य स्माने जमलेल्या मधून प्रसादाचा लाभ भक्त वर्गास देण्यात आला· | १०,०००/- | **१] श्री·सिध्दी विनायक [ओढयावरील ]देवस्थान :**<br><br>श्री·सिध्दी विनायक हे देवस्थान दर संकष्टी चतुर्थी तसेच या वर्षी गणेश मंडप व श्री चे मंडपाची वास्तुशांत असे कार्यक्रम करुन मोठया प्रमाणात भक्त वर्गास प्रसाद [ जेवण ] देण्याचा व देवस्थान समिती मार्फत करण्यात आली· इतर खर्चा साठी देणगी स्माने पैसे, धान्य, जमा केले· तरी वरील खर्चाकरिता झालेल्या दुरुस्त बजेट मध्ये तरतूद केली आहे व पुढील आर्थिक वर्षात तरतूद सूचवलेली आहे· |
| ५,०००/- | **२] श्री· पंचमुखी मारुती देवस्थान :-**<br><br>श्री· पंचमुखी मारुती देवस्थानाकडे फार पूर्वीपासून भाडेकरु आहेत· त्यांना फारच कमी दराने भाडयाने खोल्या दिलेल्या आहेत· तसेच नवीन दोन स्वतंत्र जागा भाडयाने दिलेल्या आहेत· तरी सर्व भाडेकरुंना भाडे वाढ करणे जरुरीचे आहे· त्यामानाने म्युनिसिपल कर दरवर्षी वाढतच आहे· तरी याचा विचार करता भाडे वाढ सरसकट करणे गरजेचे आहे· तसेच सदर देवस्थापची जागा रोडवर असलेने | १०,०००/- | **२] श्री· दत्त भिक्षालिंग देवस्थाने :-**<br><br>श्री· दत्त भिक्षालिंग देवस्थान हे कोल्हापूर शहराचे शहराचे मध्यवर्ती ठिकाणी असल्यामुळे व पूर्वीपासून या देवाचे श्री·गुरुव्दादशी व श्री· दत्त जयंती हे उत्सव मोठया प्रमाणात साजरे होतात· या दोन्ही उत्सवा करता भक्ता मार्फत देणगी स्माने पैसे व धान्य जमा करण्यात येते व उत्सव साजरा करण्यात येतो· तसेच जमलेल्या धान्यातून दोन उत्साहात प्रसाद ( जेवण ) |

शहर कोल्हापूर येथील स्थानिक दे स्थानचे व श्री· नरसिंहवाडी, ता·शिरोळ श्री· जोगे अन्नछत्राचे सन

चे दुरूस्त व सन चे मूळ अंदाजपत्रक संबंधीची टिपणी·

| जमेची टिपणी | | खर्चाची टिपणी |
|---|---|---|

देवस्थाने समिती मार्फत शॉपिंग सेंटर काढण्यात मोठ्या प्रमाणात वाढ होईल.

१६,०००/- ३] त्रिंबोली देवस्थान :-

श्री. त्रिंबोली देवस्थानकडे पुजारी व देवस्थान समिती यांच्या हक्कासंबंधी कोर्टात वाद सुरु आहे. देवीचे यात्रेच्या अगोदर माळावरील ब्लॉक दुकानदार लोकांना भाड्याने देवून त्यापासून उत्पन्न मिळत असते परंतु गेली चार वर्षे कोर्टामार्फत लिलाव होत असलेमुळे मिळणारे उत्पन्न कोर्टात जमा आहे. मागील महिन्यात देवस्थान समितीचे बाजूने निकाल लागल्याने चार वर्षाची देवस्थान समितीकडे जमा होणार असलेने सदरी दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच समितीच्यावतीने कोर्टाचा निकाल लागल्याने श्री. त्रिंबोली देवीचे पुढे एक मदत पेटी ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे साहजिकच उत्पन्नात वाढ होईल.

भक्तांना देण्यात उपक्रम गेले बरेच वर्षे सुरु आहे. त्यामुळे या उत्सवाकरता होणाऱ्या खर्चास तरतूद केली आहे.

२५०००/- ३] श्री. बिनखांबी गणेश मंदिर :-

श्री. बिनखांबी गणेश मंदिर या ठिकाणी दर संकष्टी चतुर्थीला पावती सभाने पैसे जमा करुन प्रसाद दिला जातो. तसेच मदत पेटी ठेवून तेथील उत्पन्नात वाढ होत आहे. दरवर्षी श्री. गणेश उत्सवा वेळी सदरचे देवालय आतून बाहेरुन रंगवण्यात येते व एक आठवडा संपूर्ण देवालयास विद्युत रोषणाई करण्यात येते. तरी सदर देवालयास वार्षिक खर्चाकरता वरील रक्कम दाखल करण्यात आलेली आहे.

२,०००/- ७] बाळूमामा देवस्थान :-

बाळूमामा देवस्थान हे शहरातील मध्यवर्ती शाहूपुरी येथे असून देवस्थानची इमारत दोन मजली आहे. त्या ठिकाणी दोन संस्थांना जागा भाड्याने दिलेली असून सदर जागेच्या मानाने भाडे फारच कमी आहे. तरी येथील

| | जमेची टिपणी | खर्चाची टिपणी |
|---|---|---|
| | भाडेवाढ करणे जरूरीचे आहे तसेच सदर जागेत सुधारणा करून जादा भाडेवाढ करून उत्पन्नात वाढ करता येईल. दरवर्षी कोल्हापूर महानगरपालिकडे घरफाळा वाढत आहे आहे. याचा विचार करून वरील भाडेवाढीचा प्रस्ताव विचाराधिन आहे. | |
| १,०००/- | ५) नरसोबावाडी नगारखाना धर्मशाळा व्यवस्था :- | |
| | नरसोबावाडी येथील नगारखाना हॉल लग्न कार्याकरता भाडयाने देणेत येता. तसेच भक्तांचे करता खोल्या भाडयाने देणेत येतात. तेथील व्यवस्थे करता रखवालदार पगार व लाईट पाणी खर्च इकडून करणेत येतो. भक्तांचे करता अधिक सुविधा व स्वच्छता यासाठी प्रयत्न करणे जरूरीचे आहे. | |

सचिव

देवस्थान व्यवस्थापन समिती,
पश्चिम महाराष्ट्र , कोल्हापूर.

<u>जमा केलेल्या पैशाचा उपयोग :-</u>

जमा केलेल्या पैशाचा उपयोग देवस्थान व्यवस्थापन मंडळ विविध धार्मिक कार्ये व विकासात्मक कार्यासाठी करत असते. उदा. धार्मिक, शाळा-कॉलेजीस काढणे, त्यांना देणगी देणे, वगैरे कामासाठी केला जातो. महाराष्ट्र सरकारकडून कोणतीही आर्थिक मदत मिळू शकत नाही. आणि घेतली जात नाही. फक्त जोतिबा परिसर विकास योजनांसासाठी देवस्थान व्यवस्थापन मंडळाने २५ लाख रु. मदत १९९१-९२ या वर्षी केलेली आहे. त्यामुळेच प्रामुख्याने व्यवस्थापन मंडळाचा अर्थसंकल्प या वर्षीच तुटीचा असलेला दिसून येतो. ही तूट भरून काढण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडून कोणतीही मदत मिळालेली नाही. ही तूट देवस्थापन व्यवस्थापन समिती आपले उत्पन्नाचे मार्ग आहेत त्याचे दर वाढवून भरून काढणार आहे. उदा. - समितीचा फंड वाढवणे, मुदत ठेवीत वाढ करणे की जेणेकरून व्याजामध्ये दरमहा वाढ होईल.

निढोरीच्या धरण प्रकल्पासाठी सुध्दा व्यवस्थापनाने मदत केलेली दिसून येते.

## प्रकरण ५ वे

पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीच्या व्यवस्थानामधे येणा-या अडचणी :-

१] अपूरे अधिकार :-

१९५० च्या पी. टी. के. कायदयान्वय जे अधिकार जे समितीला दिले आहेत म्हणजेच १९५० च्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदयानुसार ते संपूर्ण व्यवस्थेवर नियंत्रण प्रस्थापित करण्यास अपूरे आहेत.

उदा :- महसूल खात्याकडून नवीन कायदयानुसार सर्व्हे नंबर व गटक्रमांक देवस्थान मालमत्तेचे बदलेले आहेत. त्यामूळे गावठाणाचे नकाशे व सर्व्हे नंबर नकाशे मिळू शकले नाहीत. त्यामूळे मालमत्तेचा शोध घेता आलेला नाही त्यामूळे देवस्थान मालमत्तेवर अतिक्रमण झालेले दिसून येते. हे अतिक्रमाण उठवण्यासाठी अध्यक्ष, सेक्रेटरी किंवा सचिवांना जे अधिकार आहेत ते अपूरे आहेत ते अपूरे आहेत ते हे अतिक्रमाण उठवू शकलेले नाहीत.

२] ४,३५३ हेक्टर जमीन कोल्हापूर जिल्हयात आहे. कोल्हापूर जिल्हयातील ४९ जिल्हापरिषदेच्या शाळांना शेतीविषयक प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यासाठी ९४ एकर जमीन देवू केली होती. परंतू हा विषय या शाळा शिकवत नाहीत असे दिसून आल्यामूळे या जमिनी त्या त्या शाळातील मुख्याध्यापकच कसायला दुसरीकडे देवून त्याचे स्वत: उत्पन्न घेत असलेले दिसून येत आहेत. अशाप्रकारे जे उत्पन्नावर अतिक्रमाण झालेले आहे त्या बद्दल सुध्दा योग्य त्या उपाय योजना अपू-या अधिकारामूळे करता आलेल्या नाहीत त्यापैकी फक्त ११ गावच्या जिल्हापरिषदेकडील जमीनी ताब्यात घेण्यात आल्या व त्या लावणी लिलाव केल्या गेल्या त्याची एकूण रक्कम ३ लाख २०,००० रु आले. ते मूदतबंद ठेवीमधे ठेवण्यात आले त्यावरील व्याज व पिकांचा खंड [ एकूण उत्पन्नाच्या १/६ ] मिळू लागला. त्यामूळे

काही प्रमाणात देवस्थानच्या उत्पन्नात वाढ झालेली दिसून येते.

३] कोल्हापूर जिल्हयामधे देवस्थानच्या देवळात अगर ओव-यामधे १२१ शाळा भरतात. दरमहा त्यांचे भाडे फक्त ६३५ रु. १९८२ अखेर पर्यंत येत आहे ते भाडे वाढवण्याचे अधिकार मात्र समितीला देण्यात आलेले नाहीत. त्यावरील फाळा, व इतर कर याचा खर्च मात्र देवस्थान व्यवस्थापन समितीलाच करावा लागतो. या शाळांच्या भाडयांमधे वाजवी वाढ केली असता दरमहा त्याचे ६,०००/- रु एवढी भाडयामधे वाढ होवू शकेल.

४] देवस्थानच्या काही मालमत्ता [ जमीन, इमारत, दागदागिने] इ. नोंद सार्वजनिक विश्वस्त कायदयानुसार नोंदीत झालेल्या नाहीत त्यामूळेही अडचणी निर्माण झालेल्या दिसूम येतात.

५] कर्मचा-यांना योग्य त्या प्रकारचे प्रशिक्षण उदा :- पौरोहित्याचे मिळण्यास किंवा ते मिळवण्यासाठी दुसरीकडे पाठवण्यात अडचणी निर्माण झालेल्या आहेत.

६] महालक्ष्मीच्या पुजा-यांची पाळीनुसार आठवडे येतात कोणत्या आठवडयाला कोणत्या पुजा-याचा आठवडा आहे. याविषयी समितीमधे नोंद ते पुजारी करत नाहीत.

७] महालक्ष्मीच्या पुजा-या व्यतिरिक्त पौरोहित्य करणारे अनेक कूटुंबे आहेत त्यांच्या वरही नियंत्रण ठेवता आलेले नाही पौरोहित्य करण्याचा अधिकार फक्त या पुजा-यांनाच आहे. ही पूर्व परंपरागत मुनिश्वरांची ११ घराणी आहेत. त्याच्यातच पिढयांपिढया हे चालत आलेले आहे.

८] अलिकडे प्रत्येक गावाकडेच त्या त्या देवस्थानचे व्यवस्थापन त्या त्या देवस्थानचे त्या त्या गावातील प्रतिष्टीत लोकांची समिती नेमून करण्यात येणार आहे. त्यामूळे त्या त्या गावातील राजकिय पक्षांचे राजकारण त्यामधे शिरून व्यवस्थापन योग्य रितीने होणार नाही असे देवस्थान

व्यवस्थापन समितीचे सचिव पी. एम. पोवार यांचे मत आहे.

९] एखादी उत्पन्न वाढवण्याची म्हणजेच जादा बँन्केत गुंतवणूक करणे, खंड वाढवणे, विक्रीच्या वस्तूंचे [ साडया, प्रसाद वगैरे ] दर वाढवणे, या विषयी जर एखादी नवी योजना समितीने आखली तर स्थानिक हित संबंधीत राजकिय पक्षांचे पुढारी, वगैरे लोकांकडून विरोध केला जातो. व त्यामूळे आखलेल्या योजना बारगळलेल्या दिसून येतात.

१०] व्यवस्थापन करण्यासाठी जो एकूण कर्मचारी वर्ग आहे अत्यंत अपूरा आहे त्यामूळे कामकाज करण्यामधे अडचणी निर्माण झालेल्या दिसून येतात. जादा कर्मचारी वर्ग शासनाने नेमावा.

११] राजपत्रीत दर्जाच्या अधिका-याची गरज निर्माण झालेली होती. १९८५ पासून ते १९९०-९१ पर्यंत जवळ जवळ चार ते पाच वर्षे मदत मिळूश न शक्यामुळे व्यवस्थापनामधे उणीवा निर्माण झाल्या व काही अडचणी झाल्या.

१२] धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी [ उत्पन्न वाढवण्याच्या योजना असतील, बांधकामविषयक काही निर्णय असतील ते निर्णय घेण्यासाठी ज्या बैठकी होणे अत्यंत गरजेचे होत त्यर व्यवस्थितरित्या होवू शक्त नाहीत. सर्व सदस्य बैठकिस कित्येक वेळा उपस्थित नसल्यास निर्णयास विलंब लागतोव तसेच झालेल्या बैठकिंचा कार्यवृत्तांत प्रसारित केला जात नाही.

१३] अतिक्रमण काढण्यासाठी पोलीस खात्याची मदत मिळावी म्हणून शासनाकडून सूचना येवूनही नमूद केल्या प्रमाणे पोलीसांना वहिवाट व हक्क दाखवून हतबुध्द केले जाते. त्यामूळे व्यवस्थापन समितीला मालमत्तेवरील नियंत्रणाबाबत विशेष असे जादा अधिकार दिल्या शिवाय पूर्ण नियंत्रण प्रस्थापित करणे सहजगत्या शक्य होणार नाही.

१४] मालमत्तेवरील नियंत्रण ढीले पडल्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व तसेच कोल्हापूर जिल्हयातील काही कुळांनी देवालयाच्या नावाच्या इनामी जमिनी स्वत:च्या नावावर करून घेतलेल्या आहेत त्यामुळे कोर्ट, वादविवाद इ• बाबत विलंब व खर्च मोठया प्रमाणावर ह येत असतो•

अडचणीवरील उपाययोजना किंवा सूचना :-
-----------------------------

१] शासनाच्या अखत्यारित असणारी देवस्थाने त्या त्या गावातील प्रतिष्ठीत लोकांची समिती नेमून त्यांच्याकडे त्यांचे व्यवस्थापन गेल्यामुळे राजकीय पक्षांचे किंवा गावातील दोन गटांचे राजकारण शिरल्यामुळे व्यवस्थापन योग्य होणार नाही त्याचे असे खाजगीकरण सरकारने करू नये•

२] तिरुपती सारख्या मोठया देवस्थानांचे व्यवस्थापन पहाण्यासाठी एक स्वतंत्र आय• ए• एस• अधिका-यामार्फत किंवा त्याच्या नजरेखाली चाललेले आहे त्याच्या हाताखाली मोठया प्रमाणावर कर्मचारी वर्ग काम करत असतो• त्याचप्रमाणे महाराष्ट्रातही पश्चिम महाराष्ट्र देवस्थानांचे व्यवस्थापन पहाण्यासाठी राजपत्रित अधिका-याच्या हाताखाली मोठया प्रमाणावर कर्मचारी वर्ग नेमला जावा त्यामूळे कामकाज योग्यरित्या पार पाडण्यास मदत होईल व बेकार व्यक्तिंना कामही मिळू शकेल• नियंत्रणाची जी समस्या निर्माण झाली तीची समस्या काही प्रमाणात कमी जाणवेल•

३] कार्यालयाचे व्यवस्थापनासाठी विभाजन व्हावे• पश्चिम महाराष्ट्रातील देवस्थान व्यवस्थापन समितीच्या अखत्यारित येणा-या प्रत्येक जिल्हयामधे त्या त्या देवालयांचे तेथील देवालयाच्या मालमत्तेचे व्यवस्थापन योग्यरित्या होण्यासाठी वेगवेगळी कार्यालये स्थापणे महत्वाचे आहे व या कार्यालयांच्या कामकाजाचा अहवाल किंवा कार्यवृत्तांत महिना अखेरीस मुख्य कार्यालयाकडे पाठवला जावा•

४] मोठया देवस्थानच्या पुजा-यांनीही त्यांना मिळणा-या किंवा त्यांच्याकडे जमा होणा-या रकमेतून काही टक्के रक्कम जमा करून एक नवीन फंड निर्माण करावा व काही विकासकामासाठी अगर धार्मिक, नैमित्तिक उत्सवासाठी खर्च केला जावा. त्यामूळे देवस्थान मंडळावर एकूण खर्चाचा बोजा पडणार नाही.

५] मोठया देवस्थानांचे व्यवस्थापन पाहताना जी मुख्य समिती नेमली जाते त्या समितीत प्रामुख्याने त्या त्या देवालयांच्या पुजा-यापैकी जी व्यक्ती कार्यक्षम, निपक्षपाती स्वभावाची आणि प्रामाणिक असेल अशा व्यक्तिचा समावेश समितीच्या सभासदांमधे केल्यास दोघांच्या सल्ला मसलतीमुळे व्यवस्थापन करताना जे अनेक अडथळे व अडचणी निर्माण होतात त्या कमी होण्यास मदत होईल. कारण प्रत्यक्ष भक्तांशी यांचाचा जास्त जवळचा संबंध येत असतो.

५] देवस्थान व्यवस्थापन समितीचे सध्याचे अंदाजपत्रक तुटीचे आहे परंतू ते शिल्लकीचे व्हावे यासाठी प्रयत्नशील रहावे.

६] देवस्थान व्यवस्थापन समितीची जोतिबा डोंगरावरील परिसर विकास योजना अत्यंत चांगली आहे. परंतू यानंतर समितीने योजना आखताना किंवा गुंतवणूक करताना महाराष्ट्र सरकारच्या विविध विकास योजनामधे गुंतवल्यास की जेणेकरून ज्या गुंतवणूकीपासून पुन्हा उत्पन्न मिर्मिती होईल व महाराष्ट्र सरकारपुढे बेकारी, दारिद्र्य वगैरे ज्या मुख्य समस्या उभ्या आहेत. त्या कमी होण्यास मदत होईल. विभाग वार जरी विकासाच्या योजना आखल्या उदा :- पश्चिम महाराष्ट्र येथील लोकांना जादा रोजगार उपलब्ध करण्याच्या दृष्टीने नवीन उत्पन्नाची पुर्ननिर्मिती होईल अशा प्रकल्पामधे गुंतवणूकी झाल्यास त्याचा लाभ सर्वसामान्य जनतेलाही मिळू शकेल.

७] कर्मचा-यांना प्रशिक्षणाच्या उत्तम सोई उपलब्ध करून दयाव्यात.

८] कोर्ट कचे-यावर किंवा वाद विवादावर जो खर्च होतो तो टाळण्यासाठी जास्तीत जास्त संघर्ष वाढवू नये. समझोत्याचे धोरण ठेवल्यास त्यामूळेच देवस्थानचे उत्पन्न ही वाढेल व लोक प्रियताही वाढेल. त्यामूळे देणग्यांचा ओघ जास्तीजास्त मंडळाकडे येवू शकेल.

९] सचिवांची नियुक्ती ऑगस्ट १९९२ मधे पुन्हा झाल्याने व्यवस्थापना मधे ज्या अडचणी येत होत्या [ तांत्रिक ] त्या थोडया फार प्रमाणात कमी होण्यास मदत होईल. अंमलबजावणी, किंवा इतर कामांना विलंब होत होता तो टाळण्यासही आता मदत होवू शकेल.

१०] महाराष्ट्र राज्य सरकारनेही देवस्थान व्यवस्थापन समितीच्या व्यवस्थापनासंबंधी अभ्यास करण्यासाठी एखादया आयोगाची नेमणूक करावी की जेणे करून त्यांच्या शिफारसी नूसार व्यवस्थानामधे सुसुत्रता आणणे शक्य होईल.

## संदर्भ ग्रंथ


१] महाराष्ट्राची चार दैवते
लेखक -: ग. ह. खरे.

२] करविर सरकारचे वटहुकूम
व्हॉल्यूम नंबर १ - १९३६.

३] करविर सरकारचे वटहुकूम
व्हॉल्यूम नंबर २ - १९३६.

४] देवस्थान व्यवस्थापन संदर्भात माहिती टिपणी १९८०.

५]


## शासन निर्णय


१] मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा - १९५०.

२] जी.आर. रेव्हेन्यू ॲण्ड फॉरेस्ट डिपार्टमेंट १९७५- १६२१४३. परिपत्रक.

३] देवस्थान व्यवस्थापन समितीचे सन १९९२. ९ चे मूळ अंदाजपत्रक.

४] देवस्थान जमीनीचे लागण व्यवस्थेबाबत परिपत्रक तहसिलदार कार्यालय एप्रिल १९८०.

१] महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण अधिकृत प्रकाशन शुक्रवार २ मे १९७९.

२] महाराष्ट्र शासन राजपत्र ऑगस्ट २८, १९७९/- विभाग क्र. १२३६७
कलम ५६ - ५ अन्वये.